सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. ११ फेब्रुवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## प्रवीण तोगडिया सरसंघचालकांचा शब्द राखणार विश्व हिंदू परिषदेत घरवापसी होणार?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नागपूर**

केंद्रात भाजपची सत्ता स्थापन झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि विश्व हिंदू परिषदेचे तत्कालीन अध्यक्ष प्रवीण तोगडिया यांच्यात मोठे मतभेद निर्माण झाले होते. वाद विकोपाला गेल्यानंतर तोगडिया विश्व हिंदू परिषदेतून बाहरे पडले.त्यांनी आंतराष्ट्रीय विश्व हिंदू परिषद स्थापन केली होती. एकाच विचाराच्या दोन संघटना निर्माण झाल्याने राष्ट्रीय स्वयंसेवक संघही नाराज होता. आता तोगडिया यांची समजूत काढण्यात संघाला यश आल्याचे दिसून येत असून दोन्ही संघटना आता एकमेकात विलीन करण्यात येणार असल्याच्या जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत.

सरसंघचालक डॉ. मोहन भागवत आणि प्रवीण तोगडिया या संदर्भात दोन वेळा चर्चा झाली आहे. मूळचे स्वयंसेवक असेल्या तोगडिया यांनाही सरसंघचालकांचा शब्द टाळता येणे अवघड असल्याने त्यांनी विलिनीकरणास होकार दिला असल्याचे समजते. सध्या संघ आणि विश्व हिंदू परिषदेने यावर अद्याप आपली भूमिका जाहीर केली नाही.

मात्र दोन्ही एकाच विचाराच्या आणि एका परिवाराच्या संघटना असल्याने एकत्र यावे अशी इच्छा सर्वांनीच बोलून दाखवली. तोगडिया हे २४ जून २०१८ मध्ये विश्व हिंदू परिषदेपासून वेगळे झाले होते. त्यांनी आंतराष्ट्रीय विश्व हिंदू परिषदेची स्थापना केली. विश्व हिंदू परिषदेत तोगडिया यांना मानणारा मोठा वर्ग आहे. ते वेगळे झाल्याने अनेकांची अडचण झाली होती.




संघाच्या (RSS) ९९ वर्षांच्या इतिहासात प्रथमच परिवारातील संघटनेचे विभाजन झाले होते. यापूर्वी नाराज झालेले संघटनेतून बाहेर पडले. मात्र यापैकी कोणीही वेगळी संघटना स्थापन केली नव्हती. तोगडिया यांनी देशभर भ्रमण करून विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांना आपल्या संघटनेत जोडले होते. संघाचे मुख्यालय असलेल्या नागपूरमध्येही विश्व हिंदू परिषदेतही त्यामुळे फूट पडली होती.

आपसात कुठलेच मतभेद आणि हेतू विषयी शंका नसली तरी कार्यकर्ते विखुरले गेले होते. एकमेकांचा आदर राखून दोन्ही संघटनेचे काम सुरू होते. दोन्ही संघटनेच्या कार्यकर्त्यांना सर्वांनी एकत्र यावे अशी इच्छा होती. ती पूर्ण होताना दिसत आहे. प्रवीण तोगडिया यांनी संघाच्या विजया दशमीच्या उत्सवानंतर सरसंघचालक मोहन भागवत यांची भेट घेतली.

त्यानंतर पुन्हा त्यांनी आपसात भेट झाली. दोघांनी हिंदूंच्या एकतेसाठी एकत्रित काम करण्याचा संकल्प केला. मोहन भागवत यांनी सर्व हिंदूंना एकत्रित काम करण्याचे आवाहन केले असल्याचे आंतरराष्ट्रीय विश्व हिंदू परिषदेच्यावतीने सांगण्यात आले. सध्या प्रयागराजमध्ये महाकुंभमेळा सुरू आहे. कुंभ आटोपल्यानंतरच एकत्रिकरणाच्या दिशने पाऊल टाकले जाईल असे सांगण्यात येते. डॉ. प्रवीण तोगडिया यांनी या संदर्भात काहीही बोलण्यास नकार दिला. सध्या आपण कुंभमेळ्यात व्यस्त आहे. कोट्यवधी लोक कुंभमेळ्यात स्नान करण्यासाठी येत आहेत.सध्या त्यांच्या व्यवस्थेची जबाबदारी आंतराष्ट्रीय विश्व हिंदू परिषदेने उचलली आहे. आतापर्यंत लाखो लोकांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली. एक लाख ब्लँकेट वाटप करण्यात आले. प्रयागराज येथे येणाऱ्या स्वयंसेवकांच्या राहण्याची व्यवस्था येथे करण्यात आली आहे. सध्या कुंभाशिवाय दुसरा चर्चेचा विषय आपल्याकडे नसल्याचे तोगडिया यांनी स्पष्ट केले.

## शिवभोजन योजना बंद करण्याच्या निर्णय मागे घ्या; शिवभोजन चालकांचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११पुणे**

सरकारने गरीब आणि गरजू लोकांसाठी सुरू केलेली 'शिवभोजन' योजना निधीच्या कमतरतेमुळे बंद करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. राज्य शासनाने हा निर्णय मागे घ्यावा, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा कृती समितीचे शिवभोजन चालक ओंकार भागवत, मयूर बोराटे, प्रसन्न भावे, सपना माळी आणि नितीन दलभंजन यांनी पत्रकार परिषदेत दिला.

शिवभोजन चालकांनी सांगितले, ही योजना दोन लाखांहून अधिक लोकांना फक्त १० रुपयांत जेवण पुरवते आणि राज्यभर २,००० केंद्रांवर चालू आहे. मात्र, निधी कमी असल्याचे कारण देत सरकार ती बंद करत आहे. या योजनेसाठी वर्षाला फक्त २६८ कोटी रुपये खर्च येतो, तर 'लाडकी बहीण' योजनेसाठी वर्षाला ४८ हजार कोटी खर्च होतो. म्हणजेच 'लाडकी बहीण' योजनेसाठी एका महिन्यात




लागणाऱ्या पैशात 'शिवभोजन' योजना १० वर्षे चालू राहू शकते. ही योजना बंद झाली, तर अनेक महिलांचे रोजगार जातील आणि लाखो गरीब लोक अडचणीत येतील. त्यामुळे सरकारने हा निर्णय तातडीने मागे घ्यावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा कृती समितीने दिला.

## काँग्रेसमध्ये लवकरच खांदेपालट पक्षश्रेष्ठी घेणार मोठा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नवी दिल्ली**



सलग तीन विधानसभा निवडणुकीत आपले खातेही उघडू न शकलेल्या काँग्रेसला आता उशीरा जाग आली आहे. काँग्रेस लवकरच बूथ कमिटी ते वरिष्ठ पदाधिकारी यांच्यात खांदेपालट करणार आहे.

दिल्ली विधासभेत सपाटून मार खाल्यानंतर काँग्रेस पक्षश्रेष्ठी आत्मचिंतन करीत आहेत. पक्षाच्या कार्यकर्त्यांना सक्रिय करण्यासाठी जोरदार हालचाली सुरु झाल्या आहेत. पक्षाअंतर्गत विविध बदल करण्यासाठी बैठका सुरु आहेत.

फेररचनेत बदल करताना युवा कार्यकर्त्यांना मोठी जबाबदारी मिळण्याचे संकेत आहे. पक्षातील विविध सेल जे सध्या बंद आहेत, त्यांना सक्रिय करण्यात येणार आहे. ब्लॉक कमेटी ते जिल्हा स्तरावर मोठे करण्यात येणार आहे.निवडणुकीच्या काळात विरोधकांवर टीका करताना काय काळजी घ्यायची यांचा सल्ला पक्षश्रेष्ठींकडून देण्यात येणार आहे. वादग्रस्त विधान केल्याने पक्षाची प्रतिमा मलीन होते, त्यामुळे अशी विधानं करणाऱ्या पदाधिकाऱ्यांना तंबी देण्यात येणार आहे.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत नवी दिल्ली विधानसभेचे काँग्रेसचे उमेदवार संदीप दीक्षित आणि चांदणी चौक विधानसभेचे उमेदवार मुदित अग्रवाल यांनी केलेल्या वादग्रस्त विधानामुळे पक्षश्रेष्ठींनी नाराजी व्यक्त केली आहे. आगामी निवडणुकामध्ये असे प्रकार टाळण्यासाठी पक्षाने नियमावली केली आहे. त्यांची अंमलबजावणी लवकरच सुरु होणार आहे.

दिल्ली विधानसभा निवडणुकीत पक्षाचा पराभव झाला असला तरी अनेक जागांवर गेल्या निवडणुकीच्या तुलनेत मतांची टक्केवारी वाढली आहे. संदीप दीक्षित, अलका लांबा, कृष्णा तीरथ, मुदित अग्रवाल, हारून यूसुफ आणि राजेश लिलोठिया यांची अनामत रक्कम जप्त झाली आहे.

## राज ठाकरेंना पुन्हा टाळी देणार का? आदित्य ठाकरे म्हणतात, भूमिकेतील सातत्य असेल तर...!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११मुंबई**

सध्या महाराष्ट्रातील राजकारण हा एक चर्चेचा विषय ठरतोय. राज्याच्या राजकारणाबाबच मराठी लोकांच्या मनात असलेला एकमेव प्रश्न म्हणजे राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येणार का? दरम्यान याबाबत राज्याचे माजी पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी पुन्हा एकदा स्पष्टीकरण दिलं आहे.




आदित्य ठाकरे म्हणाले की, मुळात काही विषय समजण्याच्या पलीकडे असतात. काही ठराविक राजकारण रिवाईज करायचं नाही. गेल्या दोन अडीच वर्षांपासून आमचा लढा सुरू आहे. मात्र आम्ही भूमिका बदलेली नाही. सर्वांसमोर आम्ही मुख्यमत्र्यांना भेटतो आणि ज्या काही मागण्या आहे त्या मीडियासमोर मांडतो. पण काही पक्ष बिनशर्थ पाठिंबा देतात. कधी स्वबळावर लढतात, मात्र यामध्ये आमची भूमिका स्पष्ट आहे.तुम्ही कितीही आम्हाला पाडायचा किंवा फोडायचा प्रयत्न तयार करा, पण आम्ही महाराष्ट्रासाठी लढणार आहे. कितीही वार केला तरी आमचा महाराष्ट्राचा आवाज रोखणार नाही. पण जोपर्यंत महाराष्ट्राच्या हिताचे बोलत नाहीत, तोपर्यंत त्यांच्यासोबत जाणार नाही. कधीकधी त्यांच्याकडून पुढाकार घेतला जातो. मात्र त्यांच्याकडे महाराष्ट्राच्या हिताचा विचार नाही. जो देश, संविधान, जपेल आणि भूमिकेत सातत्य दाखवेल त्यांच्यासोबत आम्ही जाऊ, असंही आदित्य ठाकरे म्हणाले आहेत.

## एकनाथ शिंदेंचा आज दिल्लीत शरद पवारांच्या हस्ते होणार सन्मान

### 'महादजी शिंदे राष्ट्र गौरव' पुरस्कार जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नवी दिल्ली**

शिवसेनेचे मुख्य नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना महादजी शिंदे राष्ट्र गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला. सरहद, पुणे आयोजित अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सन्माननीय व्यक्तींचा गौरव केला जाणार आहे, अशी माहिती आयोजकांकडून देण्यात आली. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष आणि खासदार शरद पवार यांच्या हस्ते उपमुख्यमंत्री शिंदे यांना हा पुरस्कार दिला जाणार आहे.



दिल्लीत नवीन महाराष्ट्र सदनात ११ फेब्रुवारी रोजी हा पुरस्कार प्रदान समारंभ होईल. ५ लक्ष रुपये, मानपत्र, सन्मानचिन्ह आणि शिंदेशाही पगडी असे पुरस्काराचे स्वरुप आहे. केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, जेष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे आणि पद्मभूषण राम सुतार यावेळी प्रामुख्याने उपस्थित राहतील.

दरम्यान, कार्यक्रमाच्या पूर्वी शमिमा अख्तर यांच्या अभंग गायनाचा तसेच मराठी गीत गायनाचा कार्यक्रम होणार आहे.

## अण्णा हजारेंकडून टीकेचा समाचार उद्धव ठाकरे-संजय राऊतांना दिले प्रत्युत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक दि ११ नगर**

दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलेच तापले होते. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत होत्या. भाजपा, काँग्रेस आणि आम आदमी पक्षाने आपली प्रतिष्ठा पणाला लावली होती. यामध्ये भाजपाने प्रचंड मोठा विजय मिळवत आम आदमी पक्षाला चितपट केले. या रणधुमाळीत ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी अरविंद केजरीवाल यांच्यावर टीका केली होती. तसेच दिल्ली विधानसभा निवडणुका २०२५ निकालानंतर प्रतिक्रियाही दिली होती. परंतु, यातच आता ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि खासदार संजय राऊत यांनी केलेल्या टीकेचा अण्णा हजारे यांनी खरपूस शब्दांत समाचार घेतला.




संजय राऊतांनी केलेल्या टीकेवर बोलताना अण्णा हजारे म्हणाले की, ज्या रंगाचा चष्मा असतो त्या रंगाचे जग समोरच्याला दिसते. चष्माच त्या रंगाचा आहे. मग जग तसंच दिसणारच. तसेच दिल्लीत केजरीवालांचा पराभव झाला तेव्हा काहींनी झोपेतून उठून प्रतिक्रिया दिली, अशी टीका उद्धव ठाकरेंनी केली होती. यावर बोलताना, दिल्ली विधानसभा निवडणुकीबाबत पत्रकारांनी प्रश्न विचारले म्हणून मी केवळ उत्तर दिली. एरवी मी राजकीय विषयांवर बोलत नाही. पण दिल्लीच्या निकालाबाबत सगळ्यांनीच प्रशंसा केली, एखादा माणूस चुकला असेल तर चुकू द्यावे. आपण कशाला त्यावर बोलायचे, असे खोचक उत्तर अण्णा हजारेंनी दिले.

## ड्रोन कॅमेराची नजर नावालाच; बारावी परीक्षेत एकाही केंद्रावर झाले नाही ड्रोनद्वारे चित्रीकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

दहावी आणि बारावी परीक्षेच्या काळात गैरप्रकार होऊ नये; अर्थात कॉपी मुक्त अभियान राबविण्यासाठी प्रत्येक केंद्रावर ड्रोनद्वारे गस्त घालणार असल्याचे बोर्डाने सांगितले होते. प्रत्यक्षात मात्र त्या गप्पाच निघाल्याचे पाहण्यास मिळत आहे. आजपासून सुरु झालेल्या बारावीच्या परीक्षेदरम्यान एका देखील केंद्रावर ड्रोन फिरविण्यात आले नसल्याचे पाहण्यास मिळाले.

दहावी आणि बारावीच्या परीक्षा काळात बोर्डाकडून कॉपी मुक्त परीक्षा करण्यासाठी दरवर्षी वेगवेगळ्या संकल्पना राबविल्या जातात. यंदा केंद्रावर कर्मचाऱ्यांची अदलाबदली करण्याच्या निर्णयासोबत प्रत्येक परीक्षा केंद्रावर ड्रोनद्वारे पाहणी केली जाणार असल्याची घोषणा करण्यात आली होती. अर्थात कॉपीमुक्त परीक्षेसाठी आणि परीक्षेच्या काळामध्ये



परीक्षा केंद्राच्या परिसरात गैरप्रकार होऊ नये; म्हणून यावर्षी ड्रोन द्वारे नजर ठेवणार असं बोर्डाच्या वतीनं सांगण्यात आले होते.

दरम्यान आजपासून बारावीच्या परीक्षेला सुरवात झाली आहे. पहिला पेपर संपला असून प्रत्यक्षात कुठेही ड्रोन उडाले नाहीत. संवेदनशील परीक्षा केंद्रावर देखील ड्रोन कॅमेरेद्वारे चित्रीकरण करण्यात येणार होते. मात्र तसे आदेशच नसल्याने फक्त व्हिडिओ चित्रीकरण करण्यात येत असल्याचं सांगण्यात आले.

**आदेशात उल्लेखच नाही**

दरम्यान राज्य परीक्षा मंडळाचे राज्य सचिवाने काढलेल्या आदेशात ड्रोन चित्रीकरणाचा उल्लेखच नसल्याने राज्यात ड्रोन चित्रीकरण केलं गेलं नाही. त्यामुळे दहावी आणि बारावी परीक्षेच्या काळात परीक्षा केंद्रावर ड्रोन कॅमेरेद्वारे गस्त घालणार असल्याच्या बोर्डाच्या केवळ गप्पाच निघाल्या; असे आता बोलले जात आहे.

## AI मुळे रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होतील - पंतप्रधान नरेंद्र मोदी

**विदर्भ प्रजासत्ताक दि. ११ पॅरीस**

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे फ्रान्सच्या दौऱ्यावर आहेत. सोमवारी रात्री ते फ्रान्सची राजधानी पॅरीसला पोहचले. तिथे त्यांचं जोरदार स्वागत झालं. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी AI समिटमध्ये बाषण केलं. तसंच द्वीपक्षीय चर्चाही त्यांनी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे मार्सिलो या ऐतिहासिक शहराचाही दौरा करणार आहेत.



**पंतप्रधान नरेंद्र मोदी नेमकं काय म्हणाले?**

AI समिटला संबोधित करताना मोदी म्हणाले, आज AI ही काळाची गरज आहे. आमच्याकडे जगातलं सर्वात मोठं टॅलेंट आहे. आम्ही लोकांचा डेटा सुरक्षित ठेवण्यासाठी व्यवस्था तयार केली आहे. आमचं सरकार खासगी सेक्टर्सच्या मदतीने पुढे वाटचाल करतं आहे. AI चं भविष्य खूपच चांगलं आहे आणि AI मुळे सगळ्यांचं हित होणार आहे.

**AI कोड फॉर ह्युमॅनिटी लिहितो आहे-मोदी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या भाषणांत पुढे म्हणाले, AI कोड फॉर ह्युमॅनिटी लिहितो आहे. AIमुळे लाखो आयुष्यं बदलणार आहेत. काळ बदलतो आहे त्याचप्रमाणे रोजगारांचं स्वरुपही बदलतं आहे. कायमच चर्चा होतात की AI मुळे रोजगाराचं संकट निर्माण होऊ शकतं. पण इतिहास आपल्याला हेच सांगतो की कुठलंही तंत्रज्ञान नोकऱ्या घेत नाही. AI मुळे नोकरीच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत.

## संपादकीय ......

# ‘शीशमहल’ कोसळला!

केंद्रात विजयाची हॅट्ट्रिक करूनही भाजपच्या हातात देशाची राजधानी आली नव्हती. भाजपचे ते एक शल्य दूर झाले. केंद्रात सतत भाजपची आणि दिल्लीत मात्र आम आदमी पक्षाची (आप) सत्ता असल्याने गेल्या १० वर्षांत तेथे सतत राजकीय धुमश्चक्री झडत होती. आता दिल्लीकरांनी ‘आप’च्या विरोधात आणि भाजपच्या बाजूने कौल दिल्याने कामे तरी मार्गी लागतील, अशी अपेक्षा धरायला हरकत नाही. २७ वर्षांनंतर भाजपच्या हाती सत्ता आली. मतदारांनी ‘आप’दाला सत्तेबाहेर खेचले असून, अहंकार व अराजकतेचा पराभव झाला आहे, असा हल्लाबोल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला. आम आदमीच्या नावाने राजकारण करणार्या या पक्षाचे रूपांतर बघताबघता ‘खास आदमी’त झाले होते. एकेकाळी इंदिरा गांधी यांच्या एकाधिकारशाहीवादी काँग्रेसला आव्हान देत जनता पक्षाचा जन्म झाला; पण अडीच वर्षांच्या आतच त्यांचा कारभार आटोपला आणि त्यानंतर त्या पक्षाचे तुकडे झाले. राजीव गांधी यांच्या बोफोर्स भ्रष्टाचाराविरुद्ध व्ही. पी. सिंग सरकारनेही अपेक्षाभंग केला. विदेशी नागरिकांच्या विरोधातील ऑल आसाम स्टुडंटस् युनियनच्या (आसू) आंदोलनातूनच आसाम गण परिषद (आगप) या राजकीय पक्षाची स्थापना झाली. १९८५ मध्ये राजीव गांधी सरकार असताना ‘आसाम करार’ झाला आणि प्रफुल्लकुमार महंत यांच्या नेतृत्वाखाली आगपचे सरकार स्थापन झाले; पण त्या सरकारने जनतेची घोर निराशा केली. ‘इंडिया अगेन्स्ट करप्शन’च्या बॅनरखाली चळवळ सुरू केल्यानंतर २६ नोव्हेंबर २०१२ मध्ये अरविंद केजरीवाल यांनी ‘आप’ची स्थापना केली.लोकपाल व भ्रष्टाचारविरोध या दोन मुद्द्यांवरील केजरीवाल यांच्या चळवळीचे प्रेरणास्रोत अण्णा हजारे होते; पण राजकीय पक्ष स्थापन करण्यास त्यांचा विरोध असल्याने, त्यांना बाजूलाच करण्यात आले. प्रशांत भूषण, योगेंद्र यादव, कुमार विश्वास, आशुतोष प्रभृती यांसह अनेक बुद्धिमान सहकारी ‘आप’ सोडून गेले, ते केजरीवाल यांच्या एकाधिकारशाहीला कंटाळून. मग, ज्या काँग्रेसच्या भ्रष्ट कारभाराविरुद्ध टीका केली, त्याच पक्षाशी आघाडी करून केजरीवाल प्रथम मुख्यमंत्री बनले. २०१३च्या विधानसभा निवडणुकीत ‘आप’ने दुसर्या क्रमांकावरील पक्षाचे स्थान मिळवले. त्यानंतर २०१५च्या निवडणुकीत ७० पैकी ६७ आणि २०२० मध्ये ६२ जागा मिळवल्या. २०१५ ते २०२० या कालावधीत ‘आप’ने जनतेला सवलती वा मोफत वीज व पाणी दिले. वीज खरेदीमधील भ्रष्टाचार थांबवला, मोहल्ला क्लिनिकच्या माध्यमातून लाखो लोकांना उत्तम रुग्णसेवा दिली. शिक्षण व आरोग्यावर कोणत्याही राज्याने केला नाही एवढा म्हणजे ४० टक्के खर्च केला. देशातील बेरोजगारीचा सरासरी दर ३.१ टक्के असताना, दिल्लीत ‘आप’च्या राजवटीत तो फक्त १.९ टक्के होता. विविध राज्यांचे सरासरी कर्जाचे प्रमाण ठोकळ राष्ट्रीय उत्पन्नाच्या २७ टक्के असताना दिल्लीत ते फक्त ३.९ टक्के होते; पण मद्य धोरण घोटाळा, अनेक मंत्र्यांवरील भ्रष्टाचाराचे आरोप यामुळे ‘आप’ सरकारची प्रतिमा डागाळली. आरोग्यमंत्री सत्येंद्र जैन यांना मनी लाँडरिंग प्रकरणात अटक झाली, तर उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया, खासदार संजय सिंग तसेच ‘आप’चे माध्यमप्रमुख विजय नायर यांना तुरुंगात जावे लागले. त्यानंतरच्या टप्प्यात मुख्यमंत्री केजरीवाल यांनाही अटक झाली; मात्र केजरीवाल मुख्यमंत्रिपदास चिकटून राहिले आणि काही काळाने आतिशी यांची मुख्यमंत्रिपदी नियुक्ती करण्यात आली. पक्षाचे बडे नेते विधानसभा निवडणुकांपूर्वी बराच काळ कोठडीत राहिल्यामुळे पक्षाच्या मनोधैर्यावर विपरीत परिणाम झाला. जनसंपर्क कमी झाला आणि २०१५ वा २०२० प्रमाणे पक्षाला जोरदार प्रचार करता आला नाही. पक्षाचा प्रभाव ओसरल्यामुळे दिल्ली महानगरपालिकेत (एमसीडी) सत्ता असूनही नगरसेवकांत शैथिल्य आले. एमसीडीतील ‘आप’चा कारभार प्रभावशून्य ठरू लागला.

२०२२ मध्ये ‘आप’ने एमसीडीमध्ये विजय मिळवला आणि जागतिक दर्जाचे रस्ते व शहर स्वच्छ करण्याचे आश्वासन दिले; मात्र या दोन्ही आश्वासनांची पूर्तता करण्यात ‘आप’ला अपयश आले. दिल्लीत गल्लोगल्ली पडलेले कचर्याचे ढीग, खड्डेयुक्त रस्ते, प्रचंड प्रदूषण आणि पिण्याचे अशुद्ध पाणी यामुळे नागरिक त्रस्त झाले. दिल्लीचे नायब राज्यपाल काम करू देत नाहीत, ही ‘आप’ सरकारची तक्रार होती. अनेकवेळा ते काही फायली अडवून धरत, हे नाकारता येणार नाही; पण मुळात दिल्लीत मुख्यमंत्र्यांचे अधिकार मर्यादित आहेत. तसेच हीच स्थिती असताना मुख्यमंत्री म्हणून काँग्रेसच्या शीला दीक्षित यांनी शहराचा विकास करून दाखवला होता. त्यावेळी नायब राज्यपालांबरोबर त्यांनी समन्वयाने काम केले; मात्र यावेळी काँग्रेसला पुन्हा दारुण पराभवाचा सामना करावा लागला. इंडिया आघाडीतील ‘आप’ या मित्रपक्षाच्याच विरोधात दिल्ली विधानसभा निवडणूक लढवून काँग्रेसने गोंधळलेल्या अवस्थेचे दर्शन घडवले.

# सुरक्षित इंटरनेट दिनानिमित्त सायबर सुरक्षेचा जागर!

सुरक्षित इंटरनेट दिन दरवर्षी फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी जगभरात साजरा केला जातो. यंदा हा दिवस उद्या, मंगळवार, दि. ११ फेब्रुवारी२०२५ रोजी 'Together for a Better Internet' या थीमखाली साजरा होत आहे. लहान मुले आणि तरुणांमध्ये इंटरनेटच्या सुरक्षित व जबाबदार वापराविषयी जागरूकता वाढवणे हा या दिनाचा मुख्य उद्देश आहे.

आजच्या काळात शासकीय कामात सायबर सुरक्षेचे महत्त्व वाढले आहे. त्यामुळे राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र आणि जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांनी 'डशलींश र्धीी -लर्लेंर्पीी' ही मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेत सरकारी कार्यालय, बँक, खाजगी संस्था आणि नागरिक यांना त्यांच्या ऑनलाइन खात्यांच्या सुरक्षेबद्दल माहिती दिली जाईल.

**अपर्णा यावलकर**
माहिती अधिकारी,अमरावती



**सायबर सुरक्षेसाठी महत्त्वाच्या बाबी:**

**इंटरनेट सुरक्षा:** फक्त विश्वसनीय वेबसाईट वापरा. HTTPS असलेली वेबसाइट वापरा. सार्वजनिक वाय-फाय वापरताना VPN चा वापर करा आणि तुमचे सॉफ्टवेअर नेहमी अपडेट ठेवा.

**पासवर्ड सुरक्षा:** मजबूत पासवर्ड ठेवा. प्रत्येक खात्यासाठी वेगळा पासवर्ड वापरा. नियमितपणे पासवर्ड बदला आणि Two-Factor -uthentication (2F-) चा वापर करा.

**बँक खात्यांची सुरक्षा:** OTP, PIN, CVV कोणालाही देऊ नका. फिशिंग ईमेल आणि बनावट कॉल्सपासून सावध राहा. बँकेच्या ऑफिशियल पमधूनच व्यवहार करा आणि मोबाईल वॉलेट व नेट बँकिंगसाठी मजबूत पासवर्ड ठेवा.

**UPI पेमेंट सुरक्षा:** अनोळखी व्यक्तीकडून आलेली णझख पेमेंट रिक्वेस्ट स्वीकारू नका.णझख झखछ फक्त पैसे पाठवण्यासाठी असतो, घेण्यासाठी नाही, फसव्या कॉल्सला प्रतिसाद देऊ नका आणि Google Pay, PhonePe, Paytm इत्यादी प्सवर सुरक्षा सेटिंग चालू ठेवा.

**सोशल मीडिया सुरक्षा:** तुमची खासगी माहिती सार्वजनिक करू नका. मजबूत पासवर्ड ठेवा आणि 2FA सुरू करा. खोट्या ऑफर्स आणि लिंक्स टाळा आणि Facebook, Instagram, X (Twitter) वर लॉगिन अलर्ट सुरू ठेवा.

इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय 'माहिती सुरक्षा शिक्षण आणि जागरूकता' (Information Security Education and -wareness - ISE-) प्रकल्पाच्या माध्यमातून सायबर सुरक्षा आणि सायबर स्वच्छता (Cyber -ware Digital Citizens) याबद्दल जनजागृती करीत आहे.

खडए- प्रकल्पाच्या अंतर्गत, यावर्षीच्या 'सुरक्षित इंटरनेट दिना'निमित्त, म्हणजेच दि.११ फेब्रुवारी रोजी देशभरात जनजागृती मोहीम चालविली जाईल. जनजागृतीसाठी आवश्यक साहित्यhttps://staysafeonline.in/safer-internet-वरू येथे उपलब्ध आहे. जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (NIC), जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांनी सर्व नागरिकांना आणि शासकीय कर्मचाऱ्यांनी या मोहिमेत सहभागी होऊन आपली ऑनलाइन सुरक्षा वाढवावी, असे आवाहन केले आहे.

# उन्हाळी हंगामात कमी कालावधीचं काकडी पिक ठरतंय फायदेशीर; कशी कराल लागवड




**दि .११ विदर्भ प्रजासत्ताक**

काकडी हे उष्ण व कोरडे वाढणारे पीक असून, पाण्याचा उत्तम निचरा होणारी मध्यम ते भारी जमीन या पिकासाठी उपयुक्त आहे. खरीप तसेच उन्हाळी हंगामात काकडी पीक फायदेशीर आहे.

कोकणात तर पावसाळ्यात चांगले उत्पन्न मिळते. नियमित आहारात काकडीचा उपयोग केला जात असल्याने या पिकाला चांगला बाजारभाव मिळतो. खरीप हंगामात काकडीची लागवड जून, जुलै महिन्यात तसेच उन्हाळी हंगामामध्ये जानेवारी महिन्यापासून करतात.

**पूर्वमशागत**

शेतात उभी आडवी नांगरणी करून ढेकळे फोडून काढावी व एक वखरणी द्यावी. त्यानंतर शेतात आवश्यकतेनुसार चांगले कुजलेले शेणखत टाकावे व नंतर वखरणी करावी.

**लागवड कशी कराल?**

उन्हाळी हंगामासाठी ६० ते ७५ सेंटीमीटर अंतरावर सऱ्या पाडून घ्याव्यात व एक फुटाच्या अंतरावर एका बीची लागवड करावी. एक एकर काकडी लागवडीसाठी एक किलो बियाणे लागते.

व्यवस्थापनातील महत्वाच्या बाबी

- काकडी हे तीन महिन्यात तयार होणारे पीक आहे. लागवडीसाठीचा खर्च अत्यल्प आहे.

- उन्हाळी लागवड जानेवारीच्या शेवटी किंवा फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात केली असता, एप्रिलपासून उत्पादन प्राप्त होते.

- हायब्रीड काकडीचे २०० ग्रॅम बियाणे एक एकर लागवडीसाठी पुरेसे ठरते.

- काकडीमध्ये पाण्याचा अंश असल्याने उन्हाळी हंगामात चांगली मागणी असते.

- या पिकाची लागवड तिनही हंगामात करता येते.

- पाण्याची उपलब्धता व मल्चिंग पेपरचा वापर केल्यास चांगले उत्पादन काढता येते.

- सुधारित जातींची लागवड, नियोजनबद्ध खत आणि पाणी व्यवस्थापन, कीड रोगांचे नियंत्रण या गोष्टीचे चांगले नियोजन केल्यास काकडी लागवड फायद्याची आहे.

- लागवडीनंतर एका महिन्यांनी काठ्यांचा आधार घेऊन बांधणी करावी.

खत व पाणी व्यवस्थापन

- काकडी पिकासाठी ५० किलो नत्र, ५० किलो पालाश व ५० किलो स्फूरद लागवडीपूर्वी द्यावे.

- लागवडीनंतर एका महिन्याने नत्राचा ५० किलोचा दुसरा हप्ता द्यावा. पुढील खताचा डोस विद्राव्य खतांमधून द्यावा.

- उन्हाळ्यात ४ ते ५ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे.

- पिकावर कीड रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास योग्य उपाययोजना करणे आवश्यक आहे.

काढणी

काकडी पिकाची काढणी फळे थोडी कोवळी असताना करावी. काकडीचे उत्पादन हे जाती व हंगामानुसार प्रति एकरी १०० ते १२० क्विंटलपर्यंत उत्पादन मिळते.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष






# आरोग्य संपदा आहार



## फक्त पाणी पिऊनही कमी करू शकता लठ्ठपणा, जाणून घ्या हार्वर्डचे एक्सपर्ट काय म्हणतात..

**दि. ११ विदर्भ प्रजासत्ताक**

वाढतं वजन ही जगभरातील लोकांसाठी एक गंभीर समस्या बनत चालली आहे. अशात वजन कमी करण्यासाठी लोक डायटिंग, एक्सरसाईज, योगा आणि वेगवेगळ्या औषधांची मदत घेतात. याचा सगळ्यांनाच फायदा मिळतो असं नाही. बऱ्याच लोकांचं वजन मेहनत घेऊनही कमी होत नाही. सोबतच अनेकांना वजन कमी करण्याची योग्य पद्धतही माहीत नसते. वजन कमी करण्याचा एक सोपा उपाय म्हणजे पाणी आहे. पाण्यानं शरीर तर हायड्रेट राहतंच, सोबतच वजन कमी करण्यासही मदत मिळते. हार्वर्डच्या रिपोर्टनुसार, जर तुम्ही जेवण करण्याआधी पाणी प्याल तर तुम्ही यानं वजन कमी करण्यास मदत मिळेल.

**पाण्यानं पोट भरलेलं राहतं**

जेवणाआधी पाणी प्यायल्यानं पोट भरतं, ज्यामुळे तुम्ही कमी खाता. अनेकदा लोक तहान लागण्याला भूक समजतात आणि जास्त खातात. पण जर तुम्ही जेवणाआधी पाणी प्याल तर तुम्हाला जास्त खाण्याची इच्छा होणार नाही. जेवणाआधी जर एक ग्लास पाणी प्याल तर तुम्ही कमी कॅलरी इनटेक कराल. ज्यामुळे वजन कमी करण्यास मदत मिळेल.

**मेटाबॉलिज्म बूस्ट होतं**

शरीरात पाण्याचं योग्य प्रमाण कायम ठेवण्यासाठी मेटाबॉलिज्म मध्ये सुधारणा होते. जेव्हा मेटाबॉलिज्म बूस्ट होतं, तेव्हा शरीर कॅलरी वेगानं बर्न करतं, ज्यामुळे आपोआप वजन वाढण्यास मदत मिळते. एका रिसर्चमधून समोर आलं आहे की, पाणी प्यायल्यानं शरीरातील कॅलरी बर्न होण्याचा दर ३० टक्क्यांपर्यंत वाढतो. खासकरून जेव्हा पाणी थंड असतं.




**फॅट बर्निंग**

वजन कमी करण्यासाठी शरीरातील फॅट बर्न करण्याची गरज असते आणि पाणी यासाठी भरपूर मदत करतं. जेव्हा शरीराला पुरेशा प्रमाणात पाणी मिळतं, तेव्हा फॅट बर्निंगची प्रक्रिया सोपी होते. पाणी प्यायल्यानं शरीराच्या कोशिकांमधील फॅट ऊर्जेच्या रूपात बर्न केलं जाऊ शकते. ज्यामुळे वजन कमी होतं.

**पाणी पिण्याची वेळ**

वजन कमी करण्यासाठी पाणी पिण्याची वेळही महत्वाची ठरते. जेवण करण्याच्या अर्ध्या तास आधी पाणी प्यायल्यास भूक कंट्रोल होते आणि जास्त खाणं टाळता येतं. त्याशिवाय दिवसभर भरपूर पाणी प्यावं, जेणेकरून शरीराला आवश्यक हायड्रेशन मिळेल.

# ११ मार्चला अमरावती विद्यापीठाचा अर्थसंकल्प ,तर जिप.मध्ये तयारी सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात येत्या ११ मार्चला अर्थसंकल्पीय अधिसभा होणार आहे. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी दिलेल्या माहितीनुसार, सर्व विभागांकडून अर्थसंकल्पा साठी प्रस्ताव मागवण्यात आले आहेत. विद्यापीठाचा गतवर्षीचा अर्थसंकल्प २९२ कोटी २१ लाख ८७ हजार ५९० रुपयांचा होता. विद्यापीठाला केंद्र सरकार, राज्य सरकार आणि विद्यापीठ अनुदान आयोगाकडून नियमित अनुदानमिळते. याशिवाय महाविद्यालये आणि विद्यार्थ्यांकडून विविध शुल्कांच्या माध्यमातून उत्पन्न मिळते. मात्र, गतवर्षी जमा आणिखर्चयांच्याततफावत असल्यानेतुटीचे अंदाजपत्रक सादर करावे लागले होते.



## झेडपीतही तयारी सुरु

जिल्हा परिषदेतही अर्थसंकल्पाची तयारी सुरू झाली आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य वित्तवलेखाधिकारी अश्विनी मारणेयांनी १४ विभागांकडून मागणी प्रस्ताव मागवले आहेत. महिनाअखेरपर्यंत सर्व विभागांकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर सर्वसमावेशक अर्थसंकल्प तयार केला जाणार आहे.

# मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांच्या हस्ते मनपा महादेवखोरी शाळेच्या बालकला महोत्सवाचे उद्घाटन संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती–** महादेव खोरी परिसरातील मनपा उच्च प्राथमिक शाळा, महादेवखोरी येथे दि. ५ फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारी दरम्यान वार्षिक बालकला महोत्सव संपन्न झाला. विद्यार्थ्यांच्या सुप्त कला गुणांना वाव देणाऱ्या या तीन दिवसीय बालकला महोत्सवाच्या प्रथम दिवशी सोनल रंगारी सचीव कराटे असो. जि. अम. तसेच रविन्द्र साबळे केंद्रसमन्वयक, दस्तुरनगर, केंद्र क्र.९ यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध क्रिडा स्पर्धा घेण्यात आल्या. अडथळ्यांची शर्यत, पोता शर्यत, लिंबु चमचा, लंगडी, बेडूक उडी अशा विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी आपला उत्स्फुर्त सहभाग नोंदविला. क्रिडा स्पर्धांसोबतच महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्याला विद्यार्थ्यांच्या माता भगिनी तसेच परिसरातील अनेक महिला उपस्थित होत्या. या प्रसंगी उद्घाटक म्हणून दिप्ती ब्राम्हणे वरिष्ठ पोलिस निरीक्षक महिला सेल (पो.आ.कार्या.) तसेच अध्यक्षस्थानी ॲड. रचना पिंपळगावकर यांची उपस्थिती लाभली. हळदी कुंकु आणि उखाने स्पर्धा पारंपारिक आयोजना सोबतच महिलांचे ज्वलंत विषयावर उद्बोधन करण्यात आले. संध्या वासनिक शाळा निरीक्षक मनपा अम., सौ. जयश्री देशमुख



अध्यक्ष जयदिप महिला मंडळ, सौ. विघ्ने यांच्या प्रमुख उपस्थितीत सोहळा उत्साहात संपन्न झाला. बालकला महोत्सवाच्या दुस-या दिवशी आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यात अनेक विद्यार्थ्यांनी आरोग्यदायी पदार्थाची दुकाने मांडून खरी कमाई केली. प्रमुख अतिथी म्हणून लाभलेल्या अनिता गवई, नलिनी पाटील, शाळेतील विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी पदार्थांचा मनसोक्त आस्वाद घेतला. माता रमाबाई आंबेडकर यांच्या जयंती चे औचित्य साधून बालकला महोत्सवाचा निसरा हिवस विविध नृत्य, नाट्च-अभिनय अशा सांस्कृतिक कलागुणांनी सजला. मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांनी कला महोत्सवाचे उद्घाटन करून विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे भरभरुन कौतुक केले. याप्रसंगी अध्यक्ष म्हणून लाभलेल्या मनपा झोन क्र.३ च्या अतिरिक्त सहायक आयुक्त दिपिका गायकवाड यांनी महादेवखोरी शाळेतील विद्यार्थ्यांशी आगळेवेगळे भावनिक नाते निर्माण झाल्याचे प्रतिपादन आपल्या व्यक्तव्यातून केले. मनपा शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम यांनी शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या परिश्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. यावेळी अविनाश मार्डीकर यांनी शाळेच्या प्रगतीकरीता शुभेच्छा व्यक्त केल्या.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. ११ फेब्रुवारी २०२५

शहर/ग्रामिण

# अमरावती विभागातील १,५२,९८२ विद्यार्थी देणार बारावीची परीक्षा

## आजपासून प्रारंभः १२४ परीक्षा केंद्र संवेदनशील घोषित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती –** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेतल्या जाणाऱ्या १२ वी च्या परीक्षेस आज मंगळवार (ता. ११) पासून सुरुवात होणार असून अमरावती विभागात १ लाख ५ हजार विद्यार्थी ही परीक्षा देणार आहे. परीक्षेदरम्यान परीक्षा केंद्रावर कुठलाही गैरप्रकार होऊ नये त्याकरिता पोलिस यंत्रणा सज्ज असून केंद्र संचालक व पर्यवेक्षकांना सुध्दा कॉपी मुक्त परीक्षेचे निर्देश देण्यात आले आहे. विभागात ५४२ परीक्षा केंद्रापैकी १२४ परीक्षा केंद्र संवेदनशील घोषित करण्यात आले आहे.



उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च पर्यंत होणार असून ११ फेब्रुवारीला पहिला पेपर होणार आहे. विभागातील १ लाख ५२ हजार ९८२ विद्यार्थी हा पेपर देणार आहे. त्यामध्ये अकोला जिल्ह्यातून सर्वात कमी २५ हजार ९५६ विद्यार्थी या परीक्षेला बसणार असून अमरावती जिल्हातील सर्वाधिक ३६ हजार ०१७ विद्यार्थी आहे. परीक्षांदरम्यान कोणताही अनुचित प्रकार परीक्षा केंद्रांवर घडू नये म्हणून संवेदनशील परीक्षा केंद्रांवर ड्रोनद्वारे नजर ठेवण्याचे निर्देश राज्य शासनाने शिक्षण विभागाला दिले आहेत. शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या मदतीने कॉपीमुक्त परीक्षेसाठी भरारी पथकही गठित करण्यात आले आहेत. परीक्षा केंद्रांवर नियुक्त केंद्र संचालक, पर्यवेक्षक आणि परीक्षेशी संबंधित जेवढेही अधिकारी,कर्मचारी आहेत, त्यांची तंत्रज्ञानाच्या मदतीने तपासणी करून योग्य व्यक्ती परीक्षा केंद्रांवर उपस्थित आहेत की नाहीत, याचीही तपासणी केली जाईल. त्यानंतरच त्यांना परीक्षा केंद्रांच्या आत सोडले जाणार आहे. विभागीय मंडळाद्वारे सर्व विद्यार्थ्यांना ओळखपत्र देण्यात आले आहेत. ते विद्यार्थ्यांनी आठवणीने जवळ बाळगावेत, अशा सूचना सर्व कनिष्ठ महाविद्यालये, शाळांनी विद्यार्थ्यांना देण्याचे निर्देशही शासनाने मुख्याध्यापक, प्राचार्यांना दिले आहेत.

### ५०० मीटरपर्यंत बंद राहतील झेरॉक्स दुकाने

परीक्षा केंद्रांवर गोंधळ घालणाऱ्यांविरोधात अजामीनपात्र गुन्हा दाखल केला जाणार आहे.एवढेच नव्हे तर कोणालाही कॉपी करण्याची संधी मिळू नये म्हणून पेन व आवश्यक साहित्याशिवाय इतर कोणतेही साहित्य आत नेता येणार नाही. मोबाईलही विद्यार्थ्यांना जवळ बाळगता येणार नाही. पाण्याची बाटलीही पारदर्शक हवी. एवढेच नव्हे तर परीक्षा केंद्रापासून ५०० मी. परिसरात झेरॉक्सची दुकाने असतील तर ती बंद ठेवावी लागणार आहेत. यासंदर्भातील दिशा-निर्देश शासनाने शिक्षण विभागाला दिले आहेत.

### सुकळी कंपोस्ट डेपो प्रकरण......

# तीन आठवड्यात प्रतिज्ञापत्र सादर करा सुप्रीम कोर्टाचे मनपा प्रशासनाला आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती –** सुप्रीम कोर्टाने महापालिका प्रशासनाला कचऱ्यावरील प्रक्रिया, बायोमायनिंग व एसएलएफ अर्थात निघणाऱ्या कचऱ्याचे काय करणार? यासंदर्भात तीन वेगवेगळी प्रतिज्ञापत्रे तीन आठवड्यांच्या आत मागितली आहेत. सुकळी कंपोस्ट डेपो प्रकरणी सोमवारी (ता.१०) झालेल्या सुनावणी दरम्यान दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकूण घेतल्यानंतर सुप्रिम कोर्टाने हे निर्देश दिले. राष्ट्रीय हरित लवादाने सुकळी कंपोस्ट डेपोमुळे होत असलेल्या प्रदूषणाबद्दल ४७ कोटी रुपयांचा दंड ठोठावला. या दंडाला मनपाने सुप्रीम कोर्टात आव्हान दिले. आमची आर्थिक स्थिती एवढा मोठा आर्थिक दंड भरण्याची नसून आम्हाला उपाययोजना करण्यासाठी वेळ द्यावा, अशी मागणी मनपाने आव्हान याचिकेत केली होती. त्यावरच सध्या सुप्रीम कोर्टात सुनावणी सुरू असून पुढील सुनावणी ही फेब्रुवारी महिन्यात होणार





असल्याची माहिती सुकळी कंपोस्ट डेपोमुळे होणाऱ्या प्रदूषणासंदर्भात जनहित याचिका दाखल करणारे पर्यावरणप्रेमी गणेश अनासाने ऱ्यांनी दिली. सुनावणीत ३० ऑगस्ट २०२४ रोजी झालेल्या सुनावणीबाबत संक्षिप्त माहिती घेण्यात आली. यात सुप्रीम कोर्टाने वादी, प्रतिवादींचे युक्तीवाद ऐकूण घेतले. ३० ऑगस्टला मनपाने कंपोस्ट डेपोमध्ये साठलेला कचरा ७० हजार घन मीटर असून ५० हजार घन मीटर कचरा एसएएफ खोदकाम प्रक्रियेद्वारेकाढला जाईल. बायोमायनिंगद्वारे ही प्रक्रिया ३१ मार्च २०२५ पर्यंत पूर्ण केली जाईल, असे सांगितले होते. आज मनपाने सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात ९८ हजार ३३२ क्युबिक मीटर कचरा साचला असून त्यात ३० हजार ८४४ क्युबिक मी. कचरा हा आधीपासून आहे. त्याचप्रमाणे ६७ हजार ४८८ क्युबिक मी. कचरा हा एसएलएफद्वारे मिळाला आहे. तो काढायचा असल्याचे म्हटले आहे. यावर दोन सदस्यीय खंडपीठाचे न्या. अभय ओका व न्या. उज्वल भुयान यांनी साठलेल्या कचऱ्यावर कोणतीही कारवाई का झाली नाही, असा प्रश्न उपस्थित केला. ६ महिन्यानंतरही तो तसाच असून त्यात वाढ झाल्याबद्दलही आश्चर्य व्यक्त केले. सोबतच दैनिक कचरा संकलनाबाबतही संशय व्यक्त करीत ताशेरे ओढले. त्यामुळेच मनपा आयुक्तांना कचऱ्यावरील तिन्ही वेगवेगळ्या प्रक्रियाप्रकरणी वेगवेगळी प्रतिज्ञापत्रे देण्याचे निर्देश सुप्रीम कोर्टाने दिले.

# होळी सणानिमित्त मिळणार बहिणींना मोफत साडी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११ अमरावती–** मागील वर्षी होळी सणानिमित्त महिलांना साडी वाटप केली जाणार होती; परंतु लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेत साडी वाटपाचा कार्यक्रम अडकला होता. निवडणुकीनंतर टप्प्याटप्याने साडी वाटप करण्यात आली होती. यावर्षीसुद्धा होळी सणानिमित्त साडी वाटप करण्यात येणार आहे. त्यासाठी पुरवठा विभागाकडून नियोजन करणे सुरू केल्याची माहिती मिळाली दारिद्रयरेषेखालील आहे. विशेषतः अंत्योदय कार्डधारकांना साड्यांचा लाभमिळणार असल्याची माहिती मिळाली आहे.



**महिलांना प्रतिक्षा**

मागील वर्षीपासून अंत्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबांना मोफत साडी देखील दिली जात आहे. यावर्षी लवकर साड्या वाटपाची प्रतीक्षा महिला लाभार्थ्यांना सध्यातरी आहे.

### 'आनंदाचा शिधा' ने सणात गोडवा

स्वस्त धान्याचा लाभ घेणाऱ्या शिधापत्रिकाधारकांना चैत्र पाडवा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, गौरी-गणपती आणि दिवाळी सणानिमित्त स्वस्त धान्य 'आनंदाचा शिधा' वाटप केला जातो.

# अंगावर निंबू चोळून व अघोरी मंत्र मारून विवाहितेवर बलात्कार

## दिगांबर चव्हाण महाराज विरुध्द गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती** अंगावर निंबू चोळून व अघोरी मंत्र मारून विवाहितेवर बलात्कार करून मांत्रिकाने तिला पाहून घेण्याची धमकी दिल्याची धक्कादायक घटना रविवारी रात्री गाडगेनगर ठाण्याच्या हद्दीत घडली. या घटनेत पोलिसांनी पीडितेच्या तक्रारीवरून मांत्रिकाविरुध्द बलात्कार व जादुटोणा कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून मांत्रिकाचा शोध सुरु केला आहे.

अचलपूर तालुक्यातील एका गावात राहणाऱ्या २० वर्षीय पीडितेचे ६ एप्रिल २०२४ रोजी लग्न झाले होते. तेव्हापासून ती पती, सासू-सासरे व दिर यांच्यासोबत राहते आणि शेतीची कामे करते. लग्नानंतर तिचा तीनदा गर्भपात झाला होता. तिचे पोट नेहमीच दुखत व सुजत असल्याने तिच्यावर परतवाडा व अमरावती येथे उपचार सुरु होते. दरम्यान, ५ फेब्रुवारी रोजी नात्यात असलेला दिगांबर चव्हाण महाराज हा तिच्या घरी पोहोचला. त्याने पीडिताच्या पतीचा हात पाहिला आणि त्यांच्या अंगावर निंबू घासले. त्यानंतर त्याने पीडितेच्या हाताचे बोट पकडले आणि तुला बाहेरचे तीन लोक लागले आहेत, अशी बतावणी करून तिच्या सर्वांगावर निंबू घासले. तसेच तिच्या हातात, कमरेत, गळ्यात आणि दोन्ही पायाला पंचरंगी दोरा



आणि गळ्यात ताबिज बांधले.


७ फेब्रुवारी रोजी रात्री १२ नंतर पीडितेचे पोट पुन्हा दुखायला लागले. त्यामुळे तिच्या सासऱ्यांनी मांत्रिकाला फोन केला. त्यावर मांत्रिकाने तिला उद्या अमरावतीला माझ्याकडे घेऊन या, मी बघतो काय करायचे असे म्हणून फोन कट केला. त्यानुसार ८ फेब्रुवारी रोजी सकाळी पीडिता व तिचे सासरे मांत्रिकाच्या बहिणीच्या घरी गाडगेनगर ठाण्याच्या हद्दीत पोहचले.तेव्हा मांत्रिकाने तिला एका दुसऱ्या खोलीत नेले. तर तिच्या सासऱ्याला यथेच्छ दारू पाजली. त्यानंतर घरातील सर्वांना बाहेर काढले. पीडिता ही घरातील खोलीत एकटी होती. तेव्हा मांत्रिकाने तिच्या डोक्यावर काही मंत्र मारले आणि तिच्या डोळ्याला व सर्वांगावर निंबू घासले आणि तिच्यावर बलात्कार केला. तेव्हा पीडितेने आरडाओरडा करण्याचा प्रयत्न केला असता त्याने तीचे तोंड दाबले आणि तुझ्यावर जादुटोणा करेल व तुला पाहून घेईन, अशी धमकी दिली. मांत्रिक काही करेल या भीतीपोटी तिने घडलेला प्रसंग कुणालाही सांगितला नाही. तसेच तिच्या मनात आत्महत्येचे विचार घोंगावू लागले. ती अस्वस्थ झाली होती. अखेर हिम्मत करून पीडितेने ९ फेब्रुवारीला घडलेला सर्व प्रसंग पती व आईवडिलांना सांगितला. हे ऐकताच त्यांच्या पायाखालची वाळू सरकली आणि त्याच दिवशी रात्री त्यांनी गाडगेनगर ठाण्यात धाव घेतली. घटनेची गंभीरता पाहता पोलिसांनी तत्काळ गुन्हा दाखल केला. तसेच मांत्रिकाचा शोध घेतला असता तो गावातून पसार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. तेव्हा पोलीस त्याच्या शोधात आहेत.

# ४२ वर्षानंतर मनपा विद्यार्थ्यांची पहिली बॅच देणार बारावीची परीक्षा

## गणिताऐवजी इलेक्ट्रॉनिक व प्लम्बिंग हा व्यावसायिक अभ्यासक्रमाचा पर्याय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती–** महानगर पालिकेच्या स्थापनेपासून ४२ वर्षानंतर प्रथमच जमील कॉलनी मनपा उर्दू हायस्कूल आणि विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील ६६ विद्यार्थ्यांची बॅच ही मंगळवारी ११ फेब्रुवारीपासून सुरू होत असलेली १२ वीची परीक्षा देणार आहे.या विद्यार्थ्यांनी नॅशनल स्किल क्वालिफिकेशन फ्रेमवर्क (एनएसक्यूएफ) हा पर्याय निवडला आहे. अर्थात गणित विषयाऐवजी या ६६ पैकी काही विद्यार्थ्यांनी इलेक्ट्रॉनिक तर काहींनी प्लंबिंग या व्यावसायिक अभ्यासक्रमाची निवड केली आहे. एनएसक्युएफ पर्यायात एकतर इलेक्ट्रॉनिक किंवा प्लम्बिंग यापैकी एका विषयाचा पेपर द्यावा लागतो. हे व्यावसायिक अभ्यासक्रम शासकीय शाळा असल्याने मनपा क्षेत्रातील जमील कॉलनी मनपा उर्दू शाळा व जिल्हा परिषदेच्या सायन्सकोर कनिष्ठ महाविद्यालयातच उपलब्ध आहेत. जमील कॉलनी येथ इंग्रजी माध्यमाचे कनिष्ठमहाविद्यालय असून १२ वीपर्यंतचे येथे शिक्षण घेता येणे शक्य असल्याने या ठिकाणी प्रवेशासाठी विद्यार्थी मोठ्या संख्येत अर्ज करतात. गणित या विषयाला इलेक्ट्रॉनिक व प्लम्बिंग या दोन व्यावसायिक अभ्यासक्रमांचा पर्याय असल्याने येथील ६६ पैकी सर्वच विद्यार्थ्यांनी इलेक्ट्रॉनिक किंवा प्लम्बिंग विषयनिवडला आहे. त्यामुळे उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी ही जास्त राहू शकते. १०० पैकी ७० गुण प्रॅक्टिकलचे तर ३० गुण थेअरीचे असल्याची माहिती जमील कॉलनी विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य अब्दुल सईद यांनी दिली. इलेक्ट्रॉनिक विषयासाठी बीई इलेक्ट्रॉनिक व प्लम्बिंग विषयासाठी बीई सिव्हिल अभियंत्यांची नियुक्ती करण्यात आली असून इतर पाच विषयांसाठी ५ प्राध्यापक आहेत.



> शहरात महानगर पालिकेच्या जमील कॉलनी विज्ञान हायस्कूल तसेच जिल्हा परिषदेच्या सायन्सकोर विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात एनएसक्यूएफ हा पर्याय देण्यात आला आहे. कारण, या दोन्हीही शासकीय शाळा आहेत. एनएसक्यूएफमध्ये गणिताऐवजी व्यावसायिक अभ्यासक्रमाचा कोणताही एक विषय निवडता येतो.
>
> **डॉ. प्रकाश मेश्राम,** शिक्षणाधिकारी, मनपा.

# गोदाम, बारदाण्यावरून सोयाबीन खरेदी रखडणार नाही- वाघमारे

## शेतमालासंबंधी शिवसेनेची, विमा, कृषी अधिकाऱ्यांसोबत बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती–** गोदाम उपलब्ध नाही किंवा बारदाणा संपला, या कारणावरून यापुढे सोयाबीनची खरेदी रखडणार नाही, याची काळजी घेण्याची हमी जिल्हा प्रशासनाने दिली आहे. उबाठा गटाच्या शिवसैनिकांसोबत सोमवारी दुपारी जिल्हा प्रशासनाने बैठक घेतली, यावेळी हा निर्णय जाहीर करण्यात आला. बैठकीला आ. गजानन लवटे, जिल्हाप्रमुख पराग गुडधे यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते. ६ फेब्रुवारीला मंत्री दादा भुसे यांनी अमरावतीत शिक्षण विभागाची बैठक घेतली. या बैठकीपूर्वी शिवसेना (उबाठा) पक्षाच्या नेतृत्वात मंत्री दादा भुसे यांचा ताफा अडवून त्यांच्या वाहनासमोर शेतमाल फेको आंदोलन करण्यात आले होते. शेतमालाला भाव नाही, सोयाबीनची खरेदी बंद झाली, नापिकीचे अनुदान मिळाले नाही, विमा कंपन्यांनी केलेली अडवणूक आदी मुद्दे यावेळी त्यांच्यासमोर मांडले होते. त्याला अनुसरून मंत्री भुसे यांनी या विषयावर लगेच स्वतंत्र बैठक घेत सर्व अधिकाऱ्यांना योग्य ते निर्देश द्यावेत, असे जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले होते. त्यानुसार सोमवारी दुपारी साडेचार वाजता जिल्हा कचेरीच्या महसूल भवनात ही बैठक पार पडली. बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, विमा कंपन्यांचे अधिकारी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे अधिकारी, जिल्हा मार्केटिंग अधिकारी, पणन महासंघाचे अधिकारी आदी यंत्रणांचे प्रमुख उपस्थित होते. गेल्या वेळी अमरावतीत पोर्टल बंद पडल्याने सोयाबीन खरेदी रखडली होती. त्यानंतर बारदाण्याची अनुपलब्धता आणि गोदामाचा मुद्दा अडचणीचा ठरला होता. त्यामुळे यापुढे अशा अडचणी येऊ दिल्या जाणार नाहीत, असे जिल्हा प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले. इतर मुद्दे राज्य सरकारच्या धोरणात्मक निर्णयाचा भाग असल्याने ते त्यांच्याकडे पाठवले जातील, असेही या बैठकीत सांगण्यात आले.



बैठकीत सोयाबीनसह तूर, कापूस यांना भाव मिळण्याबाबतचा मुद्दाही उचलला गेला. सोयाबीन, तूर, कापसाला भाव न देता बँक जर शेतकऱ्यांच्या कर्जासाठी तगादा लावत असेल तर अधिकाऱ्यांविरोधात आंदोलन करू, असे शिवसेनेच्या प्रतिनिधी मंडळाचे म्हणणे होते. शेतकऱ्यांचे तुषार सिंचन व ठिबक सिंचनचे अनुदान प्रलंबित असून ताबडतोब शेतकऱ्यांच्या खात्यात वितरित करण्याची कारवाई करावी, सीसीआयची कापूस खरेदी सुरू ठेवावी, ऑगस्ट २०२४ चे फळगळ अनुदान वंचित शेतकऱ्यांना तातडीने वितरित करावे. भावांतर योजनेमार्फत तुरीला वाढीव अनुदान देण्यात यावे. पीक विम्याचे अनुदान हेक्टरी २ किंवा ३ हजार न देता नुकसानीच्या प्रमाणात द्यावे, आदी मुद्देही या बैठकीत उपस्थित केले. बैठकीला जिल्हाप्रमुख मनोज कडू व नरेंद्र पडोळे, जिल्हा संघटक अभिजित ढेपे, माजी जिल्हाप्रमुख प्रदीप बाजड, उपजिल्हाप्रमुख याहया खान पठाण, प्रफुल्ल भोजने, रामा सोळंके राजू राठोड, टिल्लू तिवारीसह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# इव्हीएम मशीन फोडण्याचे मतदारांना आव्हाहन करणाऱ्या बच्चू कडू वर गुन्हे दाखल करा

# भाजपा नेते गोपाल तिरमारे यांची चांदुर बाजार पोलिसात तक्रार

## Evm मशीन फोडण्याचे वक्तव्य बच्चु कडूंना भोवणार?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ चांदूर बाजार**

इव्हीएम मशीन फोडण्याचे मतदारांना आव्हाहन करणाऱ्या बच्चू कडू वर गुन्हे दाखल करा अशी मागणी भाजपा नेते गोपाल तिरमारे यांनी चांदूर बाजार पोलीस स्टेशन येथे तक्रार देत केली आहे दिनांक ८ फेब्रुवारी २०२५ रोजी छत्रपती संभाजी नगर येथे माजी आमदार बच्चू कडू यांनी विविध प्रसार माध्यमांशी बोलतांना निवडणूक आयोगाच्या कार्यप्रणालीवर मोठ्या प्रमाणात प्रश्न चिन्ह निर्माण केले निवडणूक आयोग हे मतांची चोरी करत असल्याचा गंभीर आरोप बच्चू कडू यांनी यावेळी केला तसेच नागरिकांनी या एतच् मशीन फोडल्या पाहिजे मतदानाच्या दिवशी, फोडून टाकल्या पाहिजे मतदान करायचच नाही..... फोडून टाकाव.. सगळ्या इकडे मशीन फोडून टाकायच्या अश्या प्रकारचे नागरिकांनी कायदा हातात घेवून असंविधानिक पद्धतीचे व देश विघातक कृत्य देशातील नागरीकांनी करावे तसेच निवडणूक आयोगाच्या कामकाजामध्ये मतदारांनी गैरमार्गाने व्यत्यय निर्माण करण्याकरिता नागरिकांनी प्रवृत्त व्हावे यासाठीच बच्चू कडू यांनी अश्या प्रकारची प्रतिक्रिया जाहीर रित्या प्रसिद्धी माध्यमांसमोर दिलेली आहे नागरिकांनी निवडणुकीत मतदान करू नये अश्या प्रकारचे चुकीचे आव्हाहन सुद्धा बच्चू कडू यांनी नागरिकांना यावेळी केलेलं आहे एकप्रकारे बच्चू कडू यांचे हे देशद्रोही कृत्य असून अत्यंत गंभीर असल्याच भाजपा नेते तिरमारे यांनी तक्रारी मध्ये नमूद केले व बच्चू कडू यांनी प्रसार माध्यमांना दिलेली मुलाखत मी –इझ माझा या वृत्त वाहिनीच्या अधिकृत युट्यूब चायनल च्या लिंकवर दिनांक ९ फेब्रुवारी २०२५ रोजी मी बघितलेली आहे तसेच महाराष्ट्रासह देशातील लाखो नागरिकांनी सुद्धा बच्चू कडू यांची मुलाखत/प्रतिक्रिया बघितलेली असून बच्चू कडू सारख्या एखाद्या पक्षाच्या अध्यक्षाने तसेच जबाबदार राजकीय व्यक्तिमत्व असणाऱ्या पुढाऱ्याने अश्या प्रकारे गंभीर स्वरूपाचे वक्तव्य करून नागरिकांनी कायदा हातात घेवून असंविधानिक पद्धतीचे व देश विघातक कृत्य देशातील नागरीकांनी करावे तसेच निवडणूक आयोगाच्या कामकाजामध्ये नागरिकांनी गैरमार्गाने व्यत्यय निर्माण करण्यासाठी नागरिकांनी प्रवृत्त व्हावे या उद्देशाने जाणीवपूर्वक प्रसार माध्यमांसमोर प्रतिक्रिया देणे हा प्रकार अत्यंत गंभीर असून कायदेशीर गुन्हा आहे सदर बेकायदेशीर कृती केल्या संदर्भात माजी आमदार बच्चू कडू यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी तक्रारकर्ते भाजपा नेते गोपाल तिरमारे यांनी केली आहे.

### नेमक काय आहे प्रकरण?

बच्चू कडू यांनी प्रसार माध्यमांशी बोलतांना निवडणूक आयोगाच्या कार्यप्रणालीवर मोठ्या प्रमाणात प्रश्न चिन्ह निर्माण केले निवडणूक आयोग हे मतांची चोरी करत असल्याचा गंभीर आरोप बच्चू कडू यांनी यावेळी केला तसेच नागरिकांनी या एतच् मशीन फोडल्या पाहिजे मतदानाच्या दिवशी, फोडून टाकल्या पाहिजे मतदान करायचच नाही..... फोडून टाकाव.. सगळ्या इकडे मशीन फोडून टाकायच्या कडूंनी असंविधानिक वक्तृयव्य केले म्हणत भाजपा नेते गोपाल तिरमारे यांनी थेट पोलिसात तक्रार केली आहे.





### देशद्रोही कृत्य असून बच्चू कडू यांच्या वर गुन्हे दाखल करा

ऍीं मशीन नागरिकांनी फोडावं निवडणुकीत आणि मतदान करायला जावू नये अश्या प्रकारे नागरिकांना आव्हाहन करणे म्हणजे बच्चू कडू यांचे हे देश विघातक कृत्य असून विधानसभेत झालेल्या पराभवाने ते विचलित होऊन जाणीवपूर्वक जनतेला निवडणूक आयोगाच्या कामकाजविषयी द्वेष निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. ऍीं मशीन फोडन्याकरिता जनतेला उत्तेजित करणे हे एकप्रकारचे देशद्रोही कृत्य असून बच्चू कडू यांच्या वर तश्याप्रकारचे गुन्हे दाखल करण्यात यावे तसेच यासंदर्भात निवडणूक आयोगाकडे सुद्धा मी तक्रार करणार आहे.

**–गोपाल तिरमारे भाजप नेते–**

# नेरपिंगळाई येथे पोलिस चौकी ची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती**
नेरपिंगळाई हे जिल्ह्यातील लोकसंखेने सर्वात मोठे गाव असून याची लोकसंख्या जवळ जवळ ३०००० आहे. नेरपिंगळाई हे गाव राज्यमार्ग ३०० वर असून या मार्गावरून नागपूर ते इंदूर सह छत्तीसगड आंध्रप्रदेश तेलंगणा वरून येणारी मध्यप्रदेश सह मेळघाट चिखलदरा धारणी मार्गे इंदूर खंडवा बुरहानपुर कडे जाणारी मोठी वाहतूक याच मार्गावरून होते. नेरपिंगळाई हे मोठया लोकवस्तीचे गाव असून या गावच्या मध्यभागातून हा राज्य मार्ग केलेला आहे त्यामुळे अरुंद मार्ग असल्यामुळे गावामध्ये बरेचदा वाहतूक कोंडी होते त्यामुळे या ठिकाणी एक वाहतूक पोलिस तैनात करुन ठेवावा अशी मागणी निलेश पांडे यांनी पोलिस अधिक्षक अमरावती ग्रामीण विशाल आनंद यांना केली.

त्याच प्रमाणे नेरपिंगळाई हे गाव शिरखेड पोलिस स्टेशन अंतर्गत येते आणि नेरपिंगळाई येथून शिरखेड हे अंतर ७ किमी आहे आणि एवढ्या मोठ्या नेरपिंगळाई गावाची वाहतूक व्यवस्था तसेच इतर गुन्ह्याचे कामे हे शिरखेड येथून चालतात नेरपिंगळाई येथून लहान लहान गोष्टी साठी शिरखेड गाठावे लागते किंवा कोणता गुन्हा होत असताना पोलिस स्टेशन मधून पोलिस कर्मचारी यायला वेळ लागल्यामुळे सामान्य जनता गुन्हा थांबू शकत नाही त्यामुळे एवढ्या मोठ्या गावाचा सौरक्षणाची जबाबदारी असताना येथे पोलिस चौकी झाल्यास येथील गुन्हेगारांवर वचक ठेवण्यासाठी तसेच होणारे गुन्हे रोखण्यासाठी या ठिकाणी एक पोलिस चौकी होण्याची रास्त मागणी नेरपिंगळाई येथील सामाजिक कार्यकर्ता निलेश क. पांडे यांनी पोलिस अधीक्षक अमरावती ग्रामीण विशाल आनंद याच्याकडे केली.



# शिवजयंती निमित्ताने विविध स्पर्धांचे आयोजन

## सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती** –
सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने विविध स्पर्धात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा तसेच चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी १६ फेब्रुवारी रोजी दुपारी ४ वाजता शिवटेकडीवरील खुल्या विचारमंचावर वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली असून या स्पर्धेत वाढत जाणारी कट्टर धार्मिकता आणि देशाचे भविष्य या विषयावर विद्यार्थ्यांना आपले मत मांडावे लागणार आहे. या स्पर्धेसाठी प्रथम बक्षिस ११ हजार, द्वितीय ७ हजार तसेच तृतीय बक्षिस ५ हजार आणि प्रोत्साहनपर बक्षिस २ हजार रूपये ठेवण्यात आले आहे. ही स्पर्धा मराठी भाषेतूनच होणार असून १४ फेब्रुवारी २०२५ पर्यंत स्पर्धकांना आपली नावे आयोजकांकडे ९४२०७१४४१५, ९०९६९८७८९२ या क्रमांकावर नोंदवावी लागणार आहेत. यासोबतच शालेय विद्यार्थ्यांसाठी भव्य निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली असून 'छत्रपती शिवाजी महाराज : एक शूर योद्धा' या विषयावर मराठी भाषेतून कमाल १५०० शब्दांच्या मर्यादेतील निबंध वक्तृत्व स्पर्धेच्या दिवशी दुपारी ४ ते ७ या वेळेत आयोजन समितीकडे जमा करावे लागणार आहेत. या स्पर्धेसाठी प्रथम बक्षिस ५ हजार, द्वितीय ३ हजार तर तृतीय बक्षिस प्रत्येक १ हजार असे दोन जणांना दिले जाणार आहेत. यासोबतच शालेय विद्यार्थ्यांसाठी भव्य चित्रकला स्पर्धा देखील आयोजित करण्यात आले असून या स्पर्धेत 'छत्रपती शिवाजी महाराज व किल्ले' या विषयावरील ए फोर साईजमधील कागदावरील चित्र १६ फेब्रुवारी रोजी शिवटेकडी येथे वक्तृत्व स्पर्धेच्या ठिकाणी जमा करावे लागणार आहेत. या स्पर्धेसाठी देखील अनुक्रमे ५ हजार, ३ हजार तसेच २ हजार रूपयांची रोख पारितोषिके ठेवण्यात आली आहेत.

या तीनही स्पर्धांचे बक्षिस वितरण हे दिनांक १९ फेब्रुवारी रोजी शिवटेकडी येथे आयोजित शिवजयंतीच्या मुख्य समारंभात केले जाणार आहेत. या तीनही स्पर्धांमध्ये समस्त शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे असे आवाहन सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.अधिक माहिती साठी ७०८३६९९४८९ या मो.नंबर वर संपर्क साधावा.

# आणी शेकडो नागरिकांचा येण्या- जाण्याच्या रस्ता पुन्हा सुरू

## मिलिंद बांबल यांच्या आक्रमक आंदोलनाला यश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती** :-
१०स्थानिक पन्नालाल नगर नाला पूर्ण खचल्यामुळे परिसरातील शेकडो नागरिकांचा येण्या - जाण्याच्या शॉर्टकट रस्ता बंद झाला होता नागरिकांचा त्रास लक्षात घेता माजी नगरसेवक मिलिंद बांबल यांनी सातत्याने आक्रमक आंदोलन केले नागरिकांच्या हितासाठी मिलिंद बांबल यांनी नाल्यात उतरून आक्रमक आंदोलन केले होते याची गंभीर दखल महानगर पालिकेने घेतली होती आंदोलन सुरू असतानाच मध्यझोन चे उपअभियंता प्रमोद इंगोले , अभियंता लक्ष्मण पावडे हे घटनास्थळी हजर झाले पन निधी दिल्याशिवाय नाल्याच्या बाहेर येणार नाही अशी आक्रमक भूमिका मिलिंद बांबल यांनी घेतल्यामुळे मनपाने निधी मंजुरीचे लेखी पत्र दिल्यानंतरच बांबल नाल्याच्या बाहेर आले पन काम करने अत्यंत आवश्यक होते नाहीतर रस्ता खाली कोसळुन मोठी दुर्घटना झाली असती एखादी जीवितहानी होण्याची शक्यता होती त्यामुळे मंजूर नाला दुरुस्ती लवकर सुरू करावी म्हणून मिलिंद बांबल यांनी पुन्हा आक्रमक भूमिका घेत शहर अभियंता चा केबिनला कुलूप ठोकण्याचा इशारा देत कार्यकर्तासह मनपा आयुक्त सचिनजी कलंत्रे यांची भेट घेतली व पन्नालालनगर नाला दुरुस्ती चे काम मंजूर असून तातडीने कामाला सुरुवात करावी अन्यथा मोठे आंदोलन केल्याशिवाय पर्याय राहणार नसल्याचे सांगितले मनपा आयुक्त यांनी सुद्धा मिलिंद बांबल यांच्या आक्रमक आंदोलनाची तात्काळ दखल घेत तातडीने काम सुरू करण्याचे आदेश शहर अभियंता ला दिले आज पन्नालाल नगर नाला दुरुस्ती काम पूर्ण झाले असून शेकडो नागरिकांचा येण्या - जाण्याचा रस्ता सुरू झाला नगरसेवक नसतांना सुद्धा जनतेच्या कामासाठी मागील ३० वर्षापासून सातत्याने प्रामाणिक प्रयत्न करणारे माजी नगरसेवक मिलिंद बांबल यांचे नागरिकांनी अभिनंदन केले .



# पी एम आवास योजनेसाठी नागरिक धडकले नांदगाव नगरपंचायत वर

# भोगवटाधारक नागरिकांना सरसकट घरकुलाचा लाभ द्या

## शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वात निवेदन सादर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नांदगाव खंडेश्वर**
नगरपंचायत क्षेत्रांअतर्गत भोगावटाधारक नागरिकांना सरसकट पंतप्रधान आवास योजने अंतर्गत घरकुलाचा लाभ द्यावा घरकुला करिता नवीन अर्जा साठी लादलेल्या जाचक अटी रद्द करा या मागणीसाठी शेकडो महिलां व नागरिकांनी शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वात नगरपंचायत कार्यालयावर धडक देऊन घरकुल योजनेची प्रभावी अंमलबजावणी करा मुख्याधिकारी यांना घेराव करून निवेदन सादर केले. नांदगाव नगरपंचायत अंतर्गत शहरातील नागरिकांनी सन २०१८ पासून पंतप्रधान आवास योजने अंतर्गत घरकुलाचा लाभ मिळण्याकरिता ऑनलाईन व ऑफलाइन अर्ज सादर केले होते मात्र नगरपंचायत प्रशासनाच्या दिरंगाईमुळे घरकुलाचा चौथा डी. पी.आर. तयार करण्यात आला नसल्याने ५४० नागरिकांचे अर्ज धूळखात पडत असल्याने ऑक्टोंबर २०२४ मध्ये केंद्र शासनाने सदर योजनेचे अर्ज रद्द केले त्यामुळे नांदगाव नगरपंचायतने सर्व नागरिकांना नव्याने अर्ज सादर करण्याचे आवाहन केले.मात्र त्यात जाचक अटी ठेवून अर्ज सादर करण्यास अडचण निर्माण झाली असून लाभार्थ्यांना जातीचे प्रमाणपत्र



पी.आर.कार्ड व घर कर पूर्ण भरण्याचे अनिवार्य केल्याने नागरिकांना नवीन अर्ज सादर करण्यात अडचण निर्माण झाली आहे त्यामुळे या जाचक अटी शिथिल करून लाभार्थ्यांचे नावा ऐवजी कुटुंबातील सदस्याचे जात प्रमाणपत्र ग्राह्य धरावे.५० % घर कर भरून घ्यावा आठ अ मालकी हक्काचा पुरावा व गावठाण जागेत असलेली जागा ग्राह्य धरण्यात यावी सन २०१२ चे शासन निर्णयाप्रमाणे भोगवटा धारकांना त्याच जागी घरकुलाचा लाभ द्यावा. इत्यादी मागण्याचे निवेदन नं. पं.चे मुख्याधिकारी निवृत्ती भालकर यांना निवेदन सादर करून तात्काळ सरसकट घरकुलाचा लाभ देण्यात यावा व घरकुल योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा दिला यावेळी शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांचे सह माजी नगरसेवक निलेश इखार,वासुदेव लोखंडे, माजी उपसभापती रेखाताई नागोलकर,सुनील गुरमुळे,महादेव सोनोने चेतन डकरे,नितीन दुधे,सुमित लोमटे, गुणवंत चांदुरकर, पवन डोफे,गजानन कोळमकर, रवी ठाकूर, प्रकाश ब्राह्मणवाडे, निलेश कुकडे, निलेश इंगोले अक्षय हिवराळे,अनिकेत गटुले, निलेश मारोटकर, श्याम झीमटे,भूमेश्वर गोरे, शुभम रावेकर,अतुल खंडाते, नामदेव शिरभाते,लीलाधर चौधरी, अनिता भंडारे वनिता काळबांडे,शशिकला आमडारे, शारदा सोनोने मीना सोनवणे इत्यादी उपस्थित होते.

# गो. सी. टोम्पे महाविद्यालयात भव्य रक्ततुला कार्यक्रम संपन्न

# देशातील सैनिकांना समर्पित वीर मातेची रक्ततुला

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.११चांदूर बाजार १२**
चांदूर बाजार येथील गो.सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात स्व. संजय टोम्पे व समीर देशमुख अध्यापक महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. संजय टोम्पे व समीर देशमुख यांच्या २१ व्या स्मृतीप्रीत्यर्थ देशातील वीर सैनिकांना समर्पित गणेशपुर, मोर्शी येथील शहीद अविनाश अंबादास उईके यांच्या मातोश्री श्रीमती सत्यफुलाबाई अंबादास उईके यांच्या रक्ततुलेचा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे अध्यक्ष भास्करदादा टोम्पे, संस्थेचे सचिव डॉ. विजय टोम्पे, सत्कारमूर्ती सत्यफुलाबाई उईके, अंबादासजी उईके, अविनाश ताठे, अध्यक्ष अमरावती शिंपी समाज, नायब तहसीलदार लक्ष्मीकांत तिवारी, दिलीपभाई पटेल, कैलाजी, आनंद जंगजोड, महेंद्रजी भुतडा, सुभेदार विनोदराव खुळे, शालिग्रामजी पारवेकर, धीरज सातपुते, अनिलजी डोंगरे प्राचार्य डॉ. राजेंद्र रामटेके, प्राचार्य डॉ. संजय शेजव, प्राचार्य मनीष सावरकर, प्राचार्य तुषार खोंड, प्राचार्य राहुल जोंध, डॉ. प्रवीण परीमल प्रामुख्याने व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी आपल्या प्रास्ताविकपर भाषणातून प्राचार्य डॉ. संजय शेजव यांनी कार्यक्रम आयोजनामागची भूमिका सविस्तर विशद केली तर धीरज सातपुते यांनी अमरावती जिल्ह्यातील टोम्पे महाविद्यालय हे एकमेव असे महाविद्यालय आहे की जे दरवर्षी शहीद सैनिकांच्या वीरमाता वीरपत्नीचे रक्ततुला घेऊन त्यांचा सन्मान व गौरव करत असते ही सैनिकासाठी फार मोठी गौरवाची गोष्ट असल्याचे सांगितले तसेच आपली संस्था ही देशाकरीता शहीद सैनिकाच्या आईचा रक्ततुला करुन समाज उपयोगी असे कार्यक्रम राबविते, हे देशहितासाठी मोठी गौरवाची बाब असल्याची भावनाही व्यक्त केली. शेवटी आपल्या अध्यक्षीय भाषणातून संस्थेचे अध्यक्ष भास्करदादा टोम्पे यांनी रक्ततुलेचे हे एकविसावे वर्ष असून असेच सामाजिक कार्य घडत राहो. त्यात आपल्या सर्वांचे सहकार्य आहे असे म्हणून उपस्थितांचे आभार मानले. याप्रसंगी वीरमाता श्रीमती सत्यफुलाबाई अंबादास उईके यांचा साडी-चोळी व पुष्पगुच्छ देऊन सत्कार व रक्ततुलाही करण्यात आली.

याप्रसंगी स्वर्गीय संजय टोम्पे व समीर देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या भव्य रक्तदान शिबिरात महाविद्यालयातील विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी, माजी विद्यार्थी, कर्मचारी, प्राध्यापक, परिसरातील नागरिक, विविध सामाजिक संघटना सहभागी होऊन एकूण १११ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जोपासली. सदर रक्तदान शिबिरासाठी पी. डी. एम. सी. अमरावती येथील रक्तपेढी चमू डॉ. चैताली आहेरराव, डॉ. लीना नेरकर, प्राजक्ता गुल्हाने, भगवत गुडघे, हरीसखान, अमोल कुचे, दिनेश कठाळे, प्रतीक नेवारे, अमोल तेटू यांचे सहकार्य लाभले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राहुल राजस यांनी केले तर आभार प्रा. राजेश वाडेकर यांनी मानले.



या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.–

# १३ फेब्रुवारीला अमरावती विभागस्तरीय कुस्ती स्पर्धा

## ८९ हजारांचे रोख बक्षिसांसह वैयक्तिक बक्षिसे श्री संत एकनाथ महाराज जयंती निमित्त आयोजन

विदर्भ प्रजासत्ताक
दि.११अमरावती



श्री संत एकनाथ महाराज जयंती निमित्त व स्व. अण्णाजी उर्फ शेषराव डेरे व स्व दादासाहेब सोनारकर यांचे स्मृती प्रित्यर्थ श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती व आयुष बे.यु.ना.सेवा सहकारी संस्था, आमला विश्वेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने अमरावती विभागीय स्तरीय भव्य कुस्तीचे स्पर्धा १३ फेब्रुवारी रोजी श्री संत एकनाथ महाराज मंदिराच्या मैदानावर आयोजित करण्यात आले आहे:

पुरूष गटात कुस्ती क्र.१ मध्ये २१ हजाराचे प्रथम पारितोषिक व ११ हजार रूपयाचे व्दितीय पारितोषिक नामदेव सोनारकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ मनोज सोनारकर यांच्या तर्फे देण्यात येणार आहे. कुस्ती क्र.२ मध्ये ७हजार रूपयाचे प्रथम पारितोषिक व ४ हजार रूपयाचे व्दितीय पारितोषिक स्व. मोतीराम गोफणे स्मृति प्रित्यर्थ ज्ञानेश्वर गोफणे यांच्या तर्फे देण्यात येणार आहे. कुस्ती क्र.३ मध्ये ७ हजार रूपयाचे प्रथम पारितोषिक स्व. विठ्ठलराव बनसोड स्मृती प्रित्यर्थ अरविद बनसोड तर्फे व ४ हजार रूपयाचे व्दितीय पारितोषिक स्व. पांडुरंग अनासाने स्मृती प्रित्यर्थ दीपक अनासाने यांच्या तर्फे देण्यात येणार आहे. महिला गटात कुस्ती क्र.१ मध्ये ११ हजाराचे प्रथम पारितोषिक व ५ हजार रूपयाचे व्दितीय पारितोषिक महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी, यवतमाळ येथील उपकार्यकारी अभियंता राहूल डेरे यांच्या तर्फे देण्यात येणार आहे. कुस्ती क्र.२ मध्ये ७ हजार रूपयाचे प्रथम पारितोषिक व ४ हजार रूपयाचे व्दितीय पारितोषिक अमोल उर्फ छोटू देशमुख यांच्या वतीने देण्यात येणार आहे. कुस्ती क्र.३ मध्ये ५ हजाराचे प्रथम पारितोषिक नारायण बकाले यांच्या तर्फे व ३ हजार रूपयाचे व्दितीय पारितोषिक श्रीधर बकाले यांच्या तर्फे देण्यात येणार आहे. याषिवाय सर्व कुस्ती पहेलवान यांना अशोक डोंगरे, रूपेश पोलाड व प्रभाकर भगत यांच्या तर्फे प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यात येणार आहे. तसेच सर्वोकृष्ट कुस्तीला अमोल डाहाके तळेगाव तर्फे स्व. भुजंगराव डाहाके स्मृतीप्रित्यर्थ चांदीची गदा भेट देण्यात येणार आहेकुस्ती स्पर्धा मातीवर घेण्यात येणार आहे. तसेच सर्व पहेलवान यांना १३ फेब्रुवारी, प्रर्यंत सकाळी ९ वाजेपर्यंत नोंदनी करणे आवश्यक आहे. कुस्तीचा वेळ सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत राहणार आहे. या स्पर्धेचा चांदूर रेल्वे तालुक्यासह परिसरातील नागरिकांनी उपस्थित राहून आनंद घ्यावा असे आवाहन स्पर्धेचे संयोजक प्रा. संजय तिरथकर, राजेंद्र डेरे, राजेश गोफणे व सर्व संयोजक मंडळीसह व गावकऱ्यांनी केले आहे.

# 'ड्रॉ' आटोपला, आता प्रवेशाच्या संदेशाची प्रतीक्षा

## आरटीईच्या २,४३० प्रवेशाकरिता काढली लॉटरी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.११अमरावती




जिल्ह्यात आरटीईच्या २ हजार ४०३ जागांकरिता ८ हजार १४९ पाल्यांचे ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले आहेत. याकरिता सोमवारी पुणे येथे राज्यस्तरीय लॉटरी काढण्यात आली. यामध्ये २ हजार ४०३ जागांव्यतिरिक्त तेवढ्याच जागांची प्रतिक्षा यादी दोन दिवसांत जाहीर करण्यात येणार आहे. तसेच पालकांना दुरध्वनीवर तसा संदेश देखील प्राप्त होईल. त्यानंतर लगेच कागदपत्रांची पडताळणी करून पाल्यांचा प्रवेश निश्चित करावयाचा आहे.

जिल्ह्यात २२५ शाळांमध्ये २ हजार ४३० जागांकरिता आरटीईअंतर्गत प्रवेश प्रक्रिया राबविली जात आहे. जिल्ह्यात १४ जानेवारी ते २ फेब्रुवारी दरम्यान ऑनलाइन अर्ज स्विकारण्यात आले. यामध्ये ८ हजार १४९ प्रवेश अर्ज प्राप्तझाले आहेत. ६ फेब्रुवारीपर्यंत अर्जाची पडताळणी करण्यात आली. सोमवारी, १० जानेवारीला दुपारी १ वाजता महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण) पुणे येथे लॉटरी काढण्यात आली. जिल्ह्यात २ हजार ४३० नशिबवान विद्यार्थ्यांची लॉटरी काढण्यात आली असून त्यांच्या नावाची यादी दोन दिवसांत बुधवारी जाहीर केली जाणार आहे. पालकांना पाल्यांच्या लॉगिंग पोर्टलसह त्यांच्या दुरध्वनीवर संदेश दिले जाणार आहे. यामध्ये संबधित शाळेचे नाव दिले जाणार आहे. त्यामुळे पालकांनी शाळांमध्ये प्रवेश घेण्याआधी ग्रामीणमध्ये तालुकास्तरीय समिती व शहरात महापालिकेच्या शिक्षण विभागाकडून प्रवेशाच्या मुळ कागदपत्रांची पडताळणी करणे गरजेचे आहे. समितीच्या पडताळणीनंतरच संबधित शाळांमध्ये पाल्यांचे प्रवेश निश्चित करता येणार आहे. त्यामुळे या नशिबवान पाल्यांच्या यादीची पालकांना प्रतिक्षा लागली आहे.

# डुक्कर आडवे आल्याने मिनीबस उलटली१५ जण जखमी : आसरा येथील घटना

विदर्भ प्रजासत्ताक
दि.११भातकुली



भरधाव मिनीबस समोर अचानक डुक्कर आडवे आल्याने चालकाचे नियंत्रण सुटून मिनीबस उलटल्याची घटना रात्री ९.३० वाजता भातकुली ते दर्यापूर मार्गावरील आसरा या गावाजवळ घडली. या अपघातात १५ जण जखमी झाले असून, त्यांना अमरावती जिल्हा सामान्य रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

अमरावती येथील एक परिवार व त्यांचे नातेवाईक साक्षगंध समारोहात सहभागी होण्यासाठी अकोट येथे गेले होते. समारोह आटोपून मिनीबसने अमरावतीकडे येत असताना आसरा गावाजवळ अचानकडुक्कर आडवे आल्याने चालकाचे नियंत्रण सुटून भरधाव बस रस्त्याच्या कडेला उलटली. याची माहिती मिळताच आसरा येथील नागरिकांनी तत्काळ घटनास्थळीधाव घेत बसमध्ये अडकलेल्या नागरिकांना बाहेर काढून त्यांना उपचारार्थ अमरावतीला हलविले. या घटनेत जीवितहाणी झाल्याचे वृत्त नाही.

# पोलिसांच्या कारवाईने अवैध व्यावसायिकांचे धाबे दणाणले

## स्थानिक गुन्हे शाखा-अंजनगाव पोलिसांची कारवाईसाठी वर्चस्वाची लढाई

विदर्भ प्रजासत्ताक
दि.११अमरावती




शहरासह तालुक्यांत अनेक दिवसांपासून अवैध व्यवसाय सुरू होते. याबाबत कुणीही आवाज उठवत नसल्यामुळे सर्व काही राजरोसपणे सुरू होते. एकाएकी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अंजनगाव सुर्जी ठाण्याच्या हद्दीत अवैध व्यवसायांवर कारवाईचा धडाका सुरू केला. त्यामुळे स्थानिक पोलिसांच्या कामगिरीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. त्यामुळे ही प्रतिमा सुधारण्यासाठी स्थानिक पोलिसांनी श्रीगणेशा करित कारवाईला सुरुवात केली. परिणामी, अवैध व्यावसायिकांचे धाबे चांगलेच दणाणले आहेत.

त्यामुळे स्थानिक गुन्हे शाखा व स्थानिक पोलिसांमध्ये कारवाईसाठी वर्चस्वाची लढाई तर सुरू नाही ना, असे चित्र दिसून येत आहे. दरम्यान, या कारवाईचे नागरिकांनी स्वागत केले आहे. स्थानिक पोलीस स्टेशनमधील डिबी पथक हे महत्त्वाचे समजले जाणारे आहे. या पथकाने अनेक वेळा वरिष्ठ अधिकाऱ्यांना विश्वासात न घेता कारवाई केल्या. त्यामुळे ठाणेदारांनी या पथकातील कर्मचाऱ्यांना काढून नवीन कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली होती. परंतु, स्थानिक डिबी पथकाच्या कारनाम्याची माहिती जिल्हा स्तरावर पोहोचल्याने ते बरखास्त करण्याचे आदेश वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिले होते. परंतु, तरीही तेच डिबी पथक कार्य करत असल्याचे जिल्हा स्तरावर लक्षात आले. त्यामुळे त्यातील काही कर्मचाऱ्यांना हेडक्वॉर्टरला अटॅच केल्याची सूत्रांची माहिती आहे. दरम्यान, तालुक्यात स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कारवाई करण्यासाठी गेल्या दहा ते बारा दिवसांपासून ठाण मांडून आहेत. त्यामुळे जिल्हा पोलीस प्रशासनाचा अंजनगाव सुर्जी पोलिसांवर विश्वास नाही का? की एखाद्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यावर कारवाईचे हे पूर्वसंकेत तर नाही ना? अशी चर्चा सध्या पोलीस वर्तुळात रंगत आहे.


### चार कर्मचारी मुख्यालयी अटॅच

डीबी पथकातील जयसिंग चौव्हान, आकाश रंगारी, शुभम मार्कड यांच्यासह एक वाहतूक अंमलदार युवराज सोळंके या चौघांना मुख्यालयी अटॅच करण्यात आल्याची माहिती आहे. तर अंजनगाव सुर्जी ठाण्यातील एक अधिकारी वरिष्ठांच्या रडारवर असल्याचे सूत्रांकडून समजते.

# घुईखेड येथे कळस चढविण्याच्या कार्यक्रमाने भाविकांचे लक्ष वेधले

## गोत आंबिल महाप्रसादाने बेंडोजी महाराज संजीवन समाधी सोहळ्याची सांगता

विदर्भ प्रजासत्ताक
दि.११चांदूर रेल्वे



श्रीसंत बेंडोजी महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्याच्या शेवटच्या दिवशी रविवारी गीत आबिल महाप्रसादाने सोहळ्याची सांगता झाली. यावेळी कळस चढविण्याच्या ऐतिहासिक कार्यक्रमाला शेकडो भाविकांनी हजेरी लावली होती.चांदूर रेल्वे तालुक्यातील घुईखेड येथील प्रसिध्द श्रीसंत बेडोजी महाराज यांचे संजिवनसमाधी सोहळ्याला ३० जानेवारीपासून सुरूवात झाली होती. ४ फेब्रुवारीपर्यंत संगीतमय भागवत कथा ह.भ.प. संगिता करंजीकर यांच्या वाणीतून करण्यात आले. यानंतर ५ फेब्रुवारी रोजी गोपालकाला, शोभायात्रा, दहिहांडी व त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. याचदरम्यान ६ व ७ फेब्रुवारीला शंकरपट सुध्दा उत्साहात पार पडला. या सोहळ्याच्या शेवटच्यादिवशी बेंडोजी बाबा मंदिराच्या कळसाची ३३ फुट उंची केल्यामुळे नविन कळस बसविण्याचा कार्यक्रम ९ फेब्रुवारी, रविवारला पार पडला. सकाळी ७ वाजता कळस पुजन व होम पुजनानंतर १०.३० वाजता कळस बसविण्याचा ऐतिहासीक कार्यक्रम वारी (भैरवगड) येथील महंत कृष्णानंद भारती महाराज यांच्या हस्ते व सैयाजी बाबा येळाकेळी, रुपमसिग सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी भाविकांचा जनसागर उसळला होता. दुपारी गोत आखिल महाप्रसादाने संत बेडोजी महाराज संजिवन समाधी सोहळ्याची सांगता करण्यात आली. महोत्सवाला वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमर काळे, आ.सुलभा खोडके, माजी आमदार प्रा. वीरेंद्र जगताप, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अभिजीत ढेपे, अभिजीत बोके यांनी घुईखेड येथील मंदिरात भेट देऊन श्री संत बेंडोजी महाराजांचे दर्शन घेतले. यावेळी संस्थानच्या वतीने संस्थानचे अध्यक्ष वसंत घुईखेडकर, विश्वस्त प्रवीण घुईखेडकर, राजाभाऊ चौधरी यांनी सत्कार केला.

# परतवाडा-पुणे बसच्या चाकांत अचानक बिघाड : चालकांच्या सतर्कतेने २५ प्रवासी बचावले

विदर्भ प्रजासत्ताक
दि.११परतवाडा



येथील आगारातून दररोज पुणेकरिता २८ प्रवासी क्षमता असलेली शयनयान बस रवाना होते. नेहमीप्रमाणे ९ फेब्रुवारीला परतवाडा आगारातून सायंकाळी ५ वाजता एमएच १४ एलबी २३४४ ही बस पुण्याकरिता स्वाना झाली. रात्रीच्या सुमारास चिखलीजवळ अचानक चाकात बिघाड झाल्याने २५ प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण झाला होता. मात्र, चालकाच्या समयसूचकतेमुळे मोठा अनर्थ टळला. परतवाडा येथून पुण्याला निघालेली शयनयान बस रात्रीच्या सुमारास चिखलीजवळ पोहोचली असता, अचानक मागील चाकांमध्ये यांत्रिक बिघाड झाला. चाकांचा बिघाड होऊन बस अनियंत्रित होण्याची शक्यता निर्माण झाली होती. मात्र, चालक अजय निमकर व अनिल मांजरे यांनी प्रसंगावधान राखत बस तत्काळरस्त्याच्या कडेला थांबवत प्रवाशांना सुखरूम खाली उतरवले. त्यामुळे मोठा अपघात टळला. बसमध्ये एकूण २५ प्रवासी होते. प्रवाशांनी चालकाच्या सतर्कतेचे विशेष कौतुक केले. 'घटनास्थळावर गाडी अनियंत्रित होऊ शकली असती, पण चालकाने बस योग्यवेळी नियंत्रणात घेतली. त्यामुळे आम्ही सर्वजण सुरक्षित आहोत,' असे एका प्रवाशाने सांगितले. बसमधील पुण्याकरिता जाणाऱ्यांसाठी परतवाडा आगार व्यवस्थापक जीवन वानखडे यांनी येथील अधिकाऱ्यांशी संपर्क करत त्या बसमधील प्रवाशांना दुसऱ्या बसची व्यवस्था करून त्यांच्या गंतव्यस्थानी पाठवले. आगार व्यवस्थापकांनी यांत्रिक विभागाच्या संबंधित कर्मचाऱ्यांना नोटीस दिली असून, चौकशी केली जाणार असल्याचे सांगितले. नादुरुस्त बसची चिखली येथे दुरुस्ती केली जात आहे.

# वसंताच्या स्वागतार्थ रानात पळस फुलला

विदर्भ प्रजासत्ताक
दि.११मोर्शी



सौम्य उन्हाळा सुरू झाला तरी सकाळी थंडी अजूनही अंगात असल्यासारखे जाणवत आहे. शिशिर ऋतू मावळून आता वसंत नुकताच बहरायला सुरुवात झाली आहे. अशातच ठिकठिकाणी पळस मनमोहक रंग उधळताना दिसून येत आहे.

पळस म्हणजे पलाश वृक्ष... रानाचा अग्नी. इंग्रजीत तर त्याला फ्लेम ऑफ फॉरेस्ट असे म्हटले जाते. वसंत ऋतूत फुललेल्या पळसाचं झाड सर्वांचे लक्ष वेधून घेते. उन्हाळा सुरू झाला की झाडांना पानगळ लागते आणि निष्पर्ण वृक्षांचे सांगाडे आपणास पाहावयास मिळतात. अशावेळी उन्हाळ्यातही काही झाडे नित्यक्रमाने बहरत असतात. त्यातच पळसाची झाडे लक्ष वेधून घेतात. मार्च महिन्यात होळी हा सण असून, होळीच्या रंगाकरिता ग्रामीण भागात पळसाच्या फुलांची आवश्यकता असते. यामुळे ही फुले पर्यावरण पूरक होळीसाठी वापरतात.

### प्राचीन काळापासून औषधी गुणधर्मासाठी महत्त्वपूर्ण

पळसाच्या फुलांपासून रंग बनवला जातो. ग्रामीण भागात पूर्वी पळसाच्या पानाचा उपयोग पत्रावळीसाठीही केला जायचा. आधुनिकतेच्या काळात ही बाब मागे पडली आहे. विशेष म्हणजे, प्राचीन काळापासून पळसाचा औषधशास्त्रात औषधे म्हणून बहुविध उपयोग होतो. पळसाच्या बारीक फांद्या यज्ञात समिधा म्हणून वापरतात. पळसाच्या बियांचे तेल त्वचेकरिता, त्याचा डिंक शक्तीकरिता, पान पत्रावळीसाठी, तर पळसाचे लाकूड बांधकामातही वापरण्यात येते.

# गौरी खंडारे हिची मुंबई पोलीसात शिपाई म्हणून निवड

## वाघोली गावातून पोलिसात दाखल होणारी गौरी पहिली

विदर्भ प्रजासत्ताक
दि.११नांदगाव पेठ



वाघोली येथील गौरी प्रदीप खंडारे या युवतीने मुंबई पोलिस विभागात आपले स्थान पक्के केले. १२ जानेवारी रोजी मुंबई पोलिस पदासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल शनिवारी जाहीर झाला. त्यामध्ये गौरी खंडारे हिची पोलिस शिपाईपदी निवड झाली आहे. जिद्द, चिकाटी व मेहनतीच्या जोरावर गौरीने हे यश संपादन केले असून पुढेही अभ्यास करून अधिकारी होण्याचे स्वप्न असल्याचे तिने सांगितले.वाघोली या गावातून गौरी ही पोलीस विभागात दाखल होणारी पहिली तरुणी आहे. नजीकच्या वाघोली येथील गौरी खंडारे हिची लहानपणापासून पोलिसांत जाण्याची इच्छा होती. त्या अनुषंगाने तिने उच्च शिक्षण घेत असतांनाच चालू घडामोडी, पोलीस विभागाचा अभ्यास तसेच मैदानी सराव सुरू ठेवला.१२ जानेवारी मुंबई पोलीस शिपाई पदाची परीक्षा दिल्यानंतर नुकताच परिक्षेचा निकाल जाहीर झाला व गौरी हिने १२५ गुण घेऊन परीक्षा उत्तीर्ण केली. निकाल जाहीर होताच वाघोली येथील ग्रामस्थांनी भव्य मिरवणूक काढून त्रिरत्न बुद्ध विहारात गौरीचा आई वाडीलांसह सत्कार केला तसेच भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.तिवसा विधानसभा मतदार संघाच्या माजी आ. यशोमती ठाकूर तसेच दर्यापूरचे आमदार गजानन लेवटे यांनी सुद्धा भ्रमणध्वनीवरून गौरीला शुभेच्छा दिल्या. आपल्या यशाचे श्रेय ती आपल्या आईवडिलांना व काकांना देते.

विदर्भ प्रजासत्ताक

# आंतरधर्मीय लग्न करणाऱ्यांसाठी 'सेफ हाऊस' 'ऑनर किलिंग' थांबवण्याकरिता राज्य सरकारचा पुढाकार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

जाती-धर्माची बंधने झुगारून प्रेमविवाह करणाऱ्या प्रेमीयुगुलांच्या सुरक्षेसाठी 'सेफ हाऊस' तयार करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. 'ऑनर किलिंग'च्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने प्रतिबंधात्मक उपाय म्हणून हा निर्णय घेण्यात आला असून असे 'सेफ हाऊस' तयार करण्याचे आदेश गृहमंत्रालयाकडून सर्वच पोलीस आयुक्तालये आणि जिल्हा अधीक्षक कार्यालयांना देण्यात आले आहेत.



आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय युवक-युवतीने प्रेमविवाह केल्यास अनेकदा कुटुंबीयांकडून त्यांचा छळ केला जातो. 'ऑनर किलिंग'सारखे प्रकारही घडतात. महाराष्ट्रात गेल्या सहा महिन्यांत छत्रपती संभाजीनगर, सातारा, लातूर आणि बीड जिल्ह्यात 'ऑनर किलिंग'च्या चार घटना घडल्या आहेत. यावर प्रतिबंध घालण्यासाठी राज्य सरकारच्या गृह मंत्रालयाने हालचाली सुरू केल्या असून राज्यातील सर्वच पोलीस आयुक्तालय आणि जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयांना 'सेफ हाऊस' निर्माण करण्याचे आदेश दिले आहेत.

'सेफ हाऊस' निर्माण करण्यासाठी अंधश्रद्धा निर्मूलन समितीने पहिल्यांदा पुढाकार घेतला होता. यापूर्वी सातारा येथे सेफ हाऊस तयार करण्यात आले होते. शासनाच्या निर्णयाचे स्वागत आहे. अपेक्षा हीच की, 'सेफ हाऊस' फक्त औपचारिकता ठरू नये. नवदाम्पत्यांना विश्वास वाटावा अशी व्यवस्था असावी. शासनाला मदत लागल्यास तयार आहोत. - डॉ. हमीद दाभोळकर, सदस्य, राज्य कार्यकारी समिती म.अंनिस.

**सशस्त्र पोलिसांचा २४ तास पहारा**

आंतरधर्मीय वा आंतरजातीय विवाह केल्यानंतर नवविवाहित दाम्पत्याच्या जीवाला कुटुंबीय किंवा समाजाकडून धोका असेल तर त्यांना 'सेफ हाऊस'मध्ये ठेवण्यात येईल. तेथे सशस्त्र पोलीस कर्मचाऱ्यांचा चोवीस तास पहारा असेल. 'सेफ हाऊस'मध्ये राहण्यासाठी नाममात्र शुल्क असून एक महिना ते एका वर्षापर्यंत राहता येणार आहे.

# जिल्ह्यातील विकासकामे ठप्प पडण्याची शक्यता

## १ मार्चपासून राज्यात सुरू असलेली सर्वच कामे बंद करण्याचा कंट्राकदारांचा निर्णय



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११यवतमाळ**

शासनाच्या वतीने निधीची तरतूद नसताना एकाचवेळी तब्बल ९० हजार कोटी रुपये किमतीची कामे काढून त्याच्या निविदा प्रक्रिया राबवल्या. मात्र ही कामे करणाऱ्या कंत्राटदारांना गेल्या अडीच वर्षांपासून निधीच दिलेला नाही. त्यामुळे सध्याच्या स्थितीत राज्यातील कंत्राटदारांची सुमारे २६ हजार कोटी रुपयांची देयके शासनाकडे प्रलंबित आहेत. प्रलंबित निधी मिळण्यासाठी राज्यभरातील कंत्राटदारांनी संघटित होत आंदोलन पुकारले आहे. सोमवारी यवतमाळात झालेल्या बैठकीत, राज्यातील कंत्राटदारांनी प्रलंबित देयके न मिळाल्यास येत्या १ मार्चपासून राज्यात सुरू असलेली सर्वच कामे बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्य सरकारने गेल्या तीन वर्षापासून ९० हजार कोटी रुपयांची देयके थकवली आहेत. त्यामुळे प्रलंबित देयके मिळेपर्यंत काम बंद ठेवण्याचा निर्णय कंत्राटदारांनी बैठकीत घेतला. मार्चअखेरपर्यंत देयके न दिल्यास न्यायालयात जाण्याचा इशाराही दिला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तब्बल ४६ हजार कोटी रुपये, ग्रामविकास विभागाचे आठ हजार कोटी रुपये, जलजीवन मिशनचे १८ हजार कोटी रुपये, जलसंपदा विभागाचे १९ हजार ७०० कोटी रुपये, नगरविकास विभागाचे १७ हजार कोटी रुपये आणि इतर विभागांकडूनही कंत्राटदारांना देयके मिळालेली नाहीत.जवळपास एक लाख कोटी रुपये थकलेले असताना दीड लाख कोटी रुपयांची नवीन कामे सरकारने काढली आहेत. त्यामुळे प्रलंबित निधीची तरतूद होईपर्यंत सरकारने अन्य कामे घेऊ नये, असे आवाहनही यवतमाळच्या बैठकीत कंत्राटदारांनी केले आहे.

कंत्राटदारांच्या या समस्येसंदर्भात यवतमाळ जिल्हा कंत्राटदार कल्याण संघटनेच्या पुढाकारात यवतमाळ येथे झालेल्या बैठकीमध्ये राज्यभरातून आलेल्या कंत्राटदारांच्या विविध संघटनांचे अध्यक्ष, सचिव, पदाधिकारी मोठ्या संखेने उपस्थित होते. या बैठकीमध्ये राज्य शासनाच्या विरुद्ध आंदोलन पुकारण्याचा एकमुखी निर्णय घेण्यात आला आहे. बैठकीला हॉट मिक्स संघटनेचे बाबासाहेब गुजांटे, बंटी व्होरा, कंत्राटदार महासंघाचे नगराळे, संजय मैंद, विदर्भ कंत्राटदार संघटनेचे नितीन डहाके, नितीन साळवे, बिल्डर्स असोसिएशनचे राजेंद्र आठवले, प्रदीप चड्डा, इंजिनिअर्स असोसिएशनचे प्रवीण पांडे उपस्थित होते. या बैठकीचे आयोजन जिल्हा कंत्राटदार कल्याण संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रवीण उंबरकर, सचिव अमित उत्तरवार, राहुल काळे यांच्या पुढाकारात करण्यात आले होते.

# कुंभमेळाच्या विशेष गाडीसाठी दोन दिवस पॅसेंजर गाडीला ब्रेक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नागपूर**

दक्षिण-पूर्व-मध्य रेल्वेतर्फे कुंभमेळासाठी विशेष रेल्वेगाडी सोडण्यात येत आहे. या गाडीला गोंदिया - जबलपूर -गोंदिया पॅसेंजर गाडीचे डबे वापरण्यात येणार आहे. त्यामुळे नियमित धावणारी पॅसेंजर गाडी दोन दिवस रद्द करण्यात येत आहे. कुंभमेळा स्पेशल ट्रेन सुरू करण्यासाठी जबलपूर-गोंदिया-जबलपूर ट्रेनचा 'रेक' वापरण्यात येत आहे.



त्यामुळे गाडी क्रमांक ५१७०७/ ५१७०८ जबलपूर-गोंदिया-जबलपूर १० आणि ११ फेब्रुवारी २०२५ ला रद्द करण्यात आली आहे, असे दक्षिण-पूर्व-मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने कळवले आहे.

यापूर्वी मध्य रेल्वेने कुंभमेळासाठी नागपूर येथून चार गाड्या सोडण्यात आल्या. ५ ते ९ फेब्रुवारी २०२५ ला नागपूरहून दानापूरकडे सोडण्यात आली होती. प्रयागराज येथे होणाऱ्या कुंभ मेळ्यातील प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन ५ ते ९ फेब्रुवारी दरम्यान चार विशेष गाड्या सोडण्यात आल्या. कुंभमेळा विशेष गाडी नागपूर येथून बुधवारी दुपारी १२ वाजता निघत होती आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ११.५० वाजता दानापूर येथे पोहोचत होती. कुंभमेळा विशेष गाडी दानापूर येथून ६ फेब्रुवारीला दुपारी २.३० वाजता निघत होती आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ११.४० वाजता नागपूर येथे पोहोचत होती. कुंभमेळा विशेष गाडी नागपूर येथून ८ फेब्रुवारी दुपारी ३ वाजता निघत होती आणि दुसऱ्या दिवशी दुपारी १ वाजता दानापूर येथे पोहोचली. कुंभमेळा विशेष गाडी दानापूर येथून ९ फेब्रुवारीला दुपारी २.३० वाजता निघत होती आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ११.४० वाजता नागपूर येथे पोहोचत होती.

# राज्यातील ४९६ हवालदारांना पीएसआयपदी बढती, ४२ एपीआय झाले पीआय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

राज्यात पोलीस अधिकाऱ्यांच्या शेकडो जागा रिक्त असल्यामुळे कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याचा ताण पोलीस अधिकाऱ्यांवर वाढला होता. त्यामुळे पोलीस महासंचालक कार्यालयाने राज्यातील ४९६ पोलीस हवालदारांना पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती दिली. तसेच राज्यातील ४२ सहायक पोलीस निरीक्षकांनाही पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली.




राज्य पोलीस दलात उपनिरीक्षक, सहायक निरीक्षक आणि पोलीस निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या शेकडो जागा रिक्त आहे. त्यामुळे उपलब्ध पोलीस अधिकाऱ्यांवर कायदा व सुरक्षेबाबत ताण येत होता. तसेच एकाच अधिकाऱ्यांकडे किमान ५ ते १० गुन्ह्यांचा तपास देण्यात येत असल्यामुळे अधिकाऱ्यांमध्ये नाराजीचा सूर होता. त्यामुळे पोलीस उपनिरीक्षक ते निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या पदोन्नत्या करणे अनिवार्य होते. मात्र, गृहमंत्रालय आणि महासंचालक कार्यालयात समन्वयाचा अभाव असल्यामुळे पदोन्नत्या रखडल्या होत्या. 'लोकसत्ता'ने याबाबत वृत्तमालिका प्रकाशित केली. त्याची पोलीस महासंचालक कार्यालयाने दखल घेऊन सोमवारी २०१३ अर्हता परीक्षा उत्तीर्ण ४९६ हवालदारांना पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती दिली. तसेच ४२ सहायक पोलीस निरीक्षकांना पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली. बहुप्रतीक्षित पदोन्नतीची यादी जाहिर झाल्यामुळे राज्यभरातील पोलीस अधिकाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

### पोलीस निरीक्षक अद्यापही प्रतीक्षेत

राज्य पोलीस दलात पोलीस निरीक्षक पदांवर असलेल्या अधिकाऱ्यांना सहायक पोलीस आयुक्त किंवा पोलीस उपधीक्षक पदावर पदोन्नती देण्याची प्रक्रिया संथगतीने सुरु आहे. त्यामुळे राज्य पोलीस दलातील अनेक पोलीस निरीक्षक पदोन्नतीच्या कक्षेत असतानाही पदोन्नतीसाठी वाट बघत आहेत. राज्यात सहायक पोलीस आयुक्त पदाच्या अनेक जागा रिक्त आहेत. मात्र, पदोन्नत्या रखडल्यामुळे नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

# ग्रामसेवक शहरात; गाव विकास भकास: जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतींचा कारभार ढेपाळला

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

ग्रामसेवक हा गाव आणि सरपंचयांच्यातील विकासात्मक दुवा समजाला जातो. मात्र, मूल पंचायत समितींतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायतीमधील एकही ग्रामसेवक मुख्यालयी राहत नसल्याने गाव विकासाला खीळ बसली आहे. बरेचशे ग्रामसेवक तालुक्याच्या ठिकाणावरून, तर काही ग्रामसेवक जिल्ह्याच्या ठिकाणावरून अप-डाऊन करीत आहेत. त्यामुळे गावाचा विकास कसा होणार, असा सवाल गावकरी करीत आहेत.



मात्र, ग्राम विकास अधिकारी, ग्रामसेवक गावाला पूर्णवेळ देण्यासाठी काय प्रयत्न करतात, हे मात्र कोडेच आहे.केंद्र व राज्य शासनाच्या सर्व कल्याणकारी योजना जिल्हा परिषदेमार्फत राबविल्या जातात. या सर्व योजना गावातील सर्व घटकांपर्यंत सर्वकाळ उपलब्ध होतील, असे शासनाकडून पाहिले जाते. यासाठी जिल्हा परिषदेमार्फत नियुक्त केलेल्या ग्रामसेवकांना मुख्यालयी राहणे बंधनकारक केले. मात्र, मुख्यालयी राहत असल्याचे खोटे दाखले सादर करीत असतात. गावपातळीवर ग्रामसेवकांना गावाच्या सर्वांगीण विकासाच्या अनुषंगाने मुख्यालयी राहणे बंधनकारक असल्याचा ग्रामविकास विभागाने धोरणात्मक निर्णय सुद्धा घेतला आहे.मात्र, ग्रामसेवकाकडून शासन नियमांची पायमल्ली केली जात आहे. याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होताना दिसत आहे.

**सभेलाही ग्रामसेवकांची दांडी**

तालुक्यातील काही ग्रामसेवकांकडे अनेक ग्रामपंचायतीचा डोलारा असल्याने स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन या दिवशी ध्वजारोहण कार्यक्रमाला अनुपस्थिती असते. बरेचदा ग्रामसभा व मासिक सभेला सुद्धा ग्रामसेवक दांडी मारतात. ग्रामसेवक गावात साधे फिरकूनही पाहत नसल्याने गावातील कोणता वार्ड कुठे आहे? याची साधी माहिती सुद्धा त्यांच्याकडे नसते. त्यांच्यामुळे गावातील सांडपाण्याची व्यवस्था, विजेची व्यवस्था, पाण्याची व्यवस्था यासारख्या अनेक समस्यांवर योग्य उपाययोजना करण्यात ते अपयशी ठरतात. त्यामुळे आजही अनेक गावात योग्य मूलभूत सोयीसुविधांचा अभाव आहे.

# अॅट्रॉसिटीची पाच वर्षांत १३,२५१ प्रकरणे रखडली; दिवसाला घडतात दहा घटना

## पुरोगामी महाराष्ट्रात अनुसूचित जाती, जमाती समाजावर मोठ्या प्रमाणावर अत्याचार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

अॅट्रॉसिटीचे गत पाच वर्षात १३ हजार २५१ प्रकरणे रखडली असून यावर तोडगा निघाला नाही. खरे तर ट्रॉसिटीसंदर्भात प्रलंबित प्रकरणांचा गोषवारा घेण्यासाठी मुख्यमंत्रांनी वर्षातून दोनदा बैठकी घेणे अपेक्षित आहे. मात्र याकडे यंत्रणांनी कानाडोळा चालविल्याचे चित्र आहे. राज्यात शेवटची बैठक ३० ऑगस्ट २०१८ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी घेतली होती, हे विशेष. त्यानंतरच्या मुख्यमंत्रांनी बैठकांकडे दुर्लक्ष केले, असे माहिती अधिकारातून पुढे आले आहे.




पुरोगामी महाराष्ट्रात अनुसूचित जाती, जमाती समाजावर मोठ्या प्रमाणावर अत्याचार वाढला आहे. लोकांना न्याय मिळत नाही, यावर राज्य स्तरावर बैठका घेणे आवश्यक असताना आढावा घेण्यात आला नाही.

दिवसाला दहा घटना अनुसूचित जाती, जमातीच्या लोकांसंदर्भात घडतात. मात्र राज्य सरकार यावर गंभीर नाही. तर कायद्याच्या तरतुदीप्रमाणे त्यांना आर्थिक मदतसुद्धा दिली गेली नाही. त्यामुळे राज्य सरकारने याविषयी गंभीर होऊन यावर उपाययोजना करून बैठका घेतल्या पाहिजेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते पंकज मेश्राम यांनी केली. गेल्या ५ वर्षामध्ये अनुसूचित जाती, जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यांतर्गत खून, बलात्कार, जाळपोळ आणि इतर गुन्ह्यांची संख्या राज्यात ऑगस्ट २०२४ पर्यंत १३२५१ वर पोहोचली आहे. अॅट्रॉसिटी अॅक्टच्या सुधारित २०१५ च्या कायद्याच्या सुधारित नियम २०१६ च्या नियम १६ नुसार मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली वर्षातून दोनदा जानेवारी आणि जुलै महिन्यात बैठक घेणे बंधनकारक आहे. म्हणजे २०१९ ते २०२४ पर्यंत १२ बैठका घेणे अपेक्षित होते. सामाजिक न्याय विभागाने वेळोवेळी मुख्यमंत्र्यांकडे यासंबंधित बैठकीसाठी वेळ मागितला असताना सुद्धा या बैठकीसाठी वेळच दिला नाही.

> राजकीय नेते, अधिकारी हे आम्ही संविधानाचे संरक्षक अशी भूमिका मांडताना दिसून येतात. मात्र अनुसूचित जाती, जमातीवर होणाऱ्या अत्याचारास प्रतिबंध करणाऱ्या ट्रॉसिटी कायद्याच्या अंमलबजावणीबाबत प्रचंड उदासीनता आहे.
> **- ई. झेड. खोब्रागडे, निवृत्त सनदी अधिकारी**

> गत चार महिन्यांत बरीच प्रकरणे निकाली काढली आहेत. बैठका घेण्याचा नियम, कायदा आहे. यापूर्वी आयोगाची दीड वर्ष नियुक्ती नव्हती. मुख्यमंत्र्यांच्या कामात मी हस्तक्षेप करणार नाही, त्यांना वाटेल तेव्हा ते बैठका घेतील.
> **- आनंदराव अडसूळ, अध्यक्ष, अनुसूचित जाती जमाती राज्य मागासवर्गीय आयोग**

# बारावीच्या विद्यार्थ्याने संपवलं आयुष्य

**विदर्भ प्रजासत्ताक दि. ११ सांगली**

सांगलीतील मिरजमध्ये बारावीच्या विद्यार्थ्याने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. प्रथमेश बाळासाहेब बिराजदार (१८ वर्ष) असे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्याचे नाव आहे. संबंधित विद्यार्थी हा बारावीमध्ये शिक्त होता. ११ फेब्रुवारी २०२५, आजपासून बारावीची परीक्षा सुरू झाली आहे. पण याआधीच, परीक्षा सुरू होण्याआधीच प्रथमेश बिराजदार याने सोमवारी रात्री आठ वाजता राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. लेकाच्या जाण्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# महावितरणच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत अमरावती परिमंडलाच्या खेळाडूंचे यश

## कुस्ती, टेबल टेनिससह, पॉवर लिफ्टींग मध्ये सुवर्ण : अमरावती परिमंडलातील स्नेहल बडे, विनोद गायकवाड, तेजस आबाळे यांनी कोरले सुवर्ण पदकावर नाव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

बारामती येथे नुकत्याच पार पडलेल्या महावितरणच्या राज्यस्तरीय आंतरपरिमंडलीय क्रीडा स्पर्धेत अमरावती- अकोला परिमंडलाच्या संयुक्त संघाने पॉवर लिफ्टींग, कुस्ती, टेबल टेनिस या क्रीडा प्रकारांत ५ सुवर्ण आणि ब्रीज आणि शरीर सौष्ठव या क्रिडा प्रकारात २ रजत अशी एकुण ७ पदके पटकावली आहेत. अमरावती-अकोला परिमंडलात कार्यरत पदक विजेत्या सर्व कर्मचारी खेळाडूंचा मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांनी कौतुक करत अभिनंदन केले.

बारामती येथे विद्या प्रतिष्ठान संकुलात (दि.५ ते ८ फेब्रु) पार पडलेल्या महावितरणच्या राज्यस्तरीय क्रिडा स्पर्धेकरीता २३ क्रिडा प्रकारात अमरावती-अकोला संयुक्त परिमंडलातून वैयक्तीक व सांघिक खेळासाठी महिला व पुरूष गटातून एकुण १५२ खेळाडू सहभागी झाले होते.

**विनोद गायकवाड ठरले कुस्तीवीर**

यवतमाळ येथे कार्यरत असलेले वरीष्ठ तंत्रज्ञ विनोद गायकवाड यांनी ६१ किलो वजनी गटात कुस्तीच्या अंतीम सामन्यात छत्रपती संभाजीनगर- लातूर - नादेंड परिमंडळातील खेळाडू शरद मोकळे यांच्यावर मात करत सुवर्ण पदक पटकावले, विनोद गायकवाड यांनी सलग तीसऱ्या वर्षी सुवर्ण पदक पटकावले आहे.

**स्नेहल बडे व कोमल पुरोहीत, सारिका चव्हाण, स्वाती जाधव टेबल टेनिस मध्ये अजिंक्य**

महिला गटातून टेबल टेनिस क्रिडा प्रकारात यवतमाळ येथे कार्यरत असणाऱ्या सहाय्यक अभियंता स्नेहल बडे यांनी टेबल टेनिस एकेरी मध्ये कल्याण-रत्नागीरी संघातील रंजना तीवारी यांच्यावर दणदनीत विजय मिळवत सुवर्ण पदक मिळविले,



तसेच सांघिक रित्या अकोला येथे कार्यरत असणारी सहाय्यक अभियंता कोमल पुरोहित, सहाय्यक अभियंता सारीका चव्हाण, आणि तंत्रज्ञ स्वाती जाधव यांनी याच खेळात संयुक्त कामगीरी दाखवत सांघिक कार्यालय भांडूपवर विजय मिळविला. स्नेहल बडे ह्या मागील तीन वर्षापासून सलग सुवर्ण पदकाच्या मानकरी राहिल्या आहेत.

**पॉवर लिफ्टींग मध्ये तेजस आबाळे आणि प्रवीण तायडे यांना सुवर्ण**

अमरावती येथे कार्यरत असलेले प्रधान तंत्रज्ञ तेजस आबाळे यांनी पॉवर लिफ्टींग या क्रिडा प्रकारात १०५ किलो वजनी गटात आपली छाप सोडत सुवर्ण पदक मिळविले, तर याच क्रिडा प्रकारात अकोला येथे कार्यरत असणारे तंत्रज्ञ प्रवीण तायडे ९३ किलो वजनी गटात सुवर्ण पदकाचा मानकरी ठरला.

याचसोबत महावितरणच्या क्रिडाप्रकारात नव्यानेच सामिल करण्यात आलेल्या शरीर सौष्ठव स्पर्धेत प्रधान तंत्रज्ञ मो.जरीन मो.युनुस यांना निसटता पराभव स्विकारत रजत पदकावर समाधान मानावे लागले, तर कार्यकारी अभियंता ब्रजेश गुप्ता, व्यवस्थापक यज्ञेश क्षिरसागर, उपव्यवस्थापक प्रमोद कांबळे, सहाय्यक अनुदेशक विवेक मारोडे, सहाय्यक अनुदेशिक अनुप पंडित व प्रशांत झाडे यांनी ब्रीज या सांघिक क्रिडाप्रकारात रजत पदक मिळविले. राज्यस्तरीय खेळाकरीता परिमंडल समन्वयकाची भूमिका उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मधूसुदन मराठे यांनी पार पाडली.